म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक नारायण हरी भागवत

सन १८८९

संग्रहालय क्रमांक ~~१५~~ ३८३

पुस्तकाचें नांव स्वामी चरित्र (अक्कलकोटस्वामी, भाग २ रा)

१५

चरित्र

इ.स. १८७८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
क्र. नं. ३९३.

श्री

# स्वामीचरित्र.

( भाग २ रा. — अद्भुतचमत्कार )

हें पुस्तक

नारायण हरि भागवत

यांनीं

तयार केलें.

तें

मुंबईमध्यें

"न्याशनल" छापखान्यांत छापिलें.

आश्विन शुद्ध ३ शनिवार शके १८०१, प्रमाथिनाम संवत्सरे
( तारीख १८ आक्टोबर सन १८७९ इसवी. )

( या पुस्तकाचे सर्व प्रकारचे हक्क सन १८६७ चा आक्ट
२५ प्रमाणें मालकानें आपलेकडे ठेविले आहेत. )

किंमत ८ आणे.

...ला
वर्षें तप
...भुलून प्रसाद

## आभार प्रदर्शक लेख.

या भागाच्या संबंधानें माहिती देण्याच्या कामीं वे. शा. सं. रा. रा. द‍त्तात्रय बावा साधले पुराणिक, व रा० रा० शंकर हणमंत वकील व दुसऱ्या कांहीं लोकांनीं निरनिराळ्या प्रकारची माहिती वक्तशीर पाठवून दिली याबद्दल चरित्र लिहिणारा त्यांचा फार आभारी आहे.

पां ४०४

श्री

# स्वामीचरित्र

## ( भाग २ रा–अद्भुतचमत्कार. )

श्री अक्कलकोटस्थ स्वामीमहाराजांनीं प्रसंगोपात ज्या कांहीं अद्भुत लीला केल्या ह्मणून प्रथम भागांत सांगितलें आहे, व ज्यांचें वर्णन या भागांत केलें आहे, त्यांजवरूनच संसारिक लोकांनीं महाराजांना मनुष्यलीलेनें वर्तन केलेले अवतारी पुरुष असें मानिलें आहे. खरोखर पहातां त्यांची पारख फारच थोड्या लोकांनीं केली असेल असें प्रथम भागांत सांगितलें आहे. साधारण प्रकारच्या लोकांच्या इच्छा, ह्मणजे द्रव्य, संपत्ति धंदा-रोजगार व वशीकरण इत्यादि एकाद्या योग्याच्या कृपेनें व आशीर्वादानें एकाद्यास प्राप्त होतात, या कारणानें तो योगी अवतारमालिकेत गुंफला जात नाहीं. तथापि अशा योगसाधनी लोकांसाहि कित्येक अज्ञान लोक ईश्वर असें मानतात !!! अशा प्रकारच्या समजुतीच्या लोकांनीं महाराजांस अवतारी पुरुष मानिलें आहे, आणि महाराजांविषयीं आह्मांस तिलप्रायहि संशय वाटत नाहीं, तथापि ब्रह्मत्व धुंडाळण्याच्या मार्गांत शिरलेल्या व पारख करण्यास लायख अशा पुरुषांकडून महाराजांच्या संबंधानें जो अभिप्राय निघाला असेल, तो कळल्यास विशेष ग्राह्य आहे. अशा प्रकारच्या चार पुरुषांनीं महाराजांस अवतारी ह्मटल्याविषयीं आमच्या ऐकण्यांत आलें आहे. त्याजपैकीं एक ८।९ वर्षांपूर्वीं मुंबईंत व कलकत्ता आणि मद्रास इत्यादि ठिकाणीं अत्युत्तम वक्तृत्वाचा झेंडा लावलेले व "वेदोक्तधर्मप्रकाशाचे" कर्ते श्री विष्णुबावा ब्रह्मचारी हे होत. दुसऱ्या तीन पुरुषांचीं नांवें कळलीं नाहींत, परंतु त्यांजपैकीं एक संन्याशी व दोन वैरागी होते. ह्या चार महान् भक्तांनीं निरनिराळ्या प्रसंगीं महाराजांचें दर्शन घेतलें, आणि महाराजांचें स्वरूपसुख पाहून त्यांच्या सन्निध असणाऱ्या लोकांच्या वर्तनावरून मोठ्या क्रोधानें ह्मणाले, काय ही ह्या स्थलीं अंदाधुंदी आहे!!! असली अवतारी अमोल्य वस्तु एकवेळ नाहींशी झाली कीं, पुन्हा कितीहि वर्षें तप केलें, तरी दृष्टीस पडायाची नाहीं. !!! लोकहो, व्यर्थ लोभाला भुलून प्रसाद

प्राप्त करून घेण्याची संधि दवडूं नका. परंतु काय? त्या चार सद्भक्तांस बोलण्याचा मात्र शीण झाला !!! असो; महाराजांपासून ज्यांनीं खरोखर प्रसाद उपटले आहेत, ते तर गुप्तच आहेत, परंतु ते त्यांनीं स्वपराक्रमावर उपटले आहेत !!! आणि फार लांबच्या अंतरावरून !!! तथापि सन्निध असणाऱ्यांपैकीं एकानें तरी– बोलावयासच नको!

आह्मांला अद्भुतचमत्काराच्या संबंधानें जी माहिती मिळाली, ती सर्व अक्कलकोटापासून दूरदूरच्या ठिकाणाहून मिळाली, व जी मिळाली, ती बहुतेक सर्व ज्यांच्या ज्यांच्याकडून आली त्यांच्या त्यांच्याकडून व बहुतेक अगदींच अपरिचित अशा गृहस्थांकडून आणि त्यांच्या स्वसंतोषानें आली असल्यानें विशेष भरंवशालायक आहे असें आमचें मत आहे. असो, आमच्या या मुंबई शहरांत, ज्या ठिकाणीं सर्व प्रकारची टवाळकीचीं सोंगें मुद्दाम येणारीं, व ज्या ठिकाणीं त्यांची शहानिशहा होते, तेथें ज्या गृहस्थानें २९।३० वर्षें सतत काढलीं असून, ज्यास राजविद्येचा लोकांनीं मान डोलविण्यासारिखा संस्कार झाला आहे, अशा गृहस्थानें समर्थांच्या अंतरसाक्षपणाविषयीं व निरनिराळ्या रूपांत दर्शनें दिल्याविषयीं आह्मांस समक्ष हकीकत सांगितली; ती अशी आहे कीं, रा. रा. गोविंद विष्णु भिडे, हे ५।६ वर्षांपूर्वीं नवस फेडण्याच्या उद्देशानें स्वामीदर्शनास अक्कलकोट येथें गेले होते. त्यावेळीं मुंबईहून अक्कलकोटास जातांना महाराजांस भक्तिमार्गाविषयीं कांहीं विचारावें असें भिडे यांच्या मनांत मात्र आलें होतें. परंतु या गोष्टीची वाच्यता त्यांनीं आपल्या वांचून दुसऱ्या कोणाजवळहि केली नव्हती. असें असतां महाराजांच्या दर्शनास भिडे गेले मात्र, तोंच भिडे यांजकडे दृष्टीचा रोख फिरविल्यासारखें करून महाराजांनीं श्लोक ह्मणण्यास आरंभ केला :–

उपासनेला दृढ चालवावें ॥ सत्कर्मयोगें वय घालवावें ॥
भूदेव संतांसि सदा लवावें ॥ सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥

हा श्लोक भिडे यांनीं श्रवण करण्याबरोबर अंतरास्थितिज्ञाते महाराज आहेत अशी त्यांची खातरी झाली असेल हें सांगणें नकोच. परंतु भिडे यांच्या तीन दिवसांच्या रहाण्यांत प्रत्येक दिवशीं महाराजांनीं भिडे यांस निरनिराळ्या स्वरूपांत दर्शन दिलें. हा अद्भुत प्रकार पाहून भिडे यांस प्रेमाश्चर्य वाटलें आणि त्यांची महाराजांविषयीं अत्यंत पूज्य बुद्धि झाली. दुसरी एक गोष्ठ अशी ऐकण्यांत आली कीं, बारा वर्षे वेदांतविष-

याकडे गुरुकृपेनें मन वळलेले पुण्यांतील रा० रा० नारायण बल्लाळ उर्फ नाना जोशी–सध्यां मयत–व रा० रा० सदाशिव बल्लाळ गोंडे आणि दुसरे कांहीं गृहस्थ मिळून अक्कलकोटास समर्थांच्या दर्शनास सुमारें १० वर्षांपूर्वीं गेले होते. त्यावेळीं पदरूपी मेवा नानांनीं महाराजांकरितां मोठया भक्तीनें तयार करून नेला होता. गांवांत उतरल्यावर बिऱ्हाडाची वगैरे सोय लावून ही मंडळी समर्थांच्या दर्शनास गेली, त्यावेळीं समर्थ पलंगावर डोळ्यांवर पांघरूण घेऊन स्वस्थ पडले होते. तथापि कोणत्याहि प्रकारचा विकल्प मनांत न आणतां नानांनीं पदरूपी मेवा स्वामींपुढे ठेविला. तें पाहून स्वारी खुष झाली, आणि मोठया आनंदानें टाळ्या वाजवीत उठून बसतांना नानांकडे पाहून आपण परळीच्या ब्राह्मणांस भेटलां व पांढरभुईचें खेडें पाहिलें काय? ह्मणून विचारलें. ही खूण नानांची नानांस पटतांच त्यांना महाराजांच्या दर्शनाचें किती सुख झालें असेल याचा विचार वाचकांनींच करावा. ही एक प्रकारची खूण पटून दुसरी कांहीं गोष्ट नानांच्या मनांत येत आहे, तोंच त्या गोष्टीचें नाना बोलल्यावांचून महाराजांनीं निराकरण केलें. वेदांती लोक फार चिकित्सक असतात. परंतु पूर्व संकल्पाच्या आणि ताज्या संकल्पाच्या गोष्टींची सांगितल्यावांचून महाराजांनीं तात्रडतोब नानांना पटे अशी फोड करून देण्याबरोबर महाराजांच्या अंतरसाक्षपणाची नानांची खातरी झाली हें सांगणें नकोच. असो; दुसऱ्या एका प्रसंगीं अशी कांहीं नक्कल झाली कीं, महाराजांपासून कांहीं उपटण्याच्या हेतूनें भगवीं वस्त्रें धारण केलेले तिघे संन्याशी आले. त्यावेळीं महाराजांची स्वारी शिंदोरे यांच्या वाड्यांत बसली होती. महाराजांनीं या तिघांस आलेले पाहून आपण त्या घरून उठून जोशीबावांच्या घरीं चालते झाले. मागोमाग सर्व सेवेकरी लोकांचें लटांबरचें लटांबर गेलें. दर्शनास आलेले लोकाहि तिकडे जाऊं लागले. त्या प्रमाणें हे तिघे दंडी संन्याशीहि तिकडे गेले. त्यांना पाहून जोशीबावांस तीन पाट आणण्याची महाराजांनीं आज्ञा केली. ते आणलेले पाट या तिघां संन्याशांस बसण्याकरितां देऊन आपल्याकरितां चौथा पाट आणण्यास सांगितलें. आपणहि त्यांच्या समोर पाटावर बसले. इतक्यांत लोकांची दर्शनाची गर्दी उडाली, आणि महाराजांच्या पुढें फळफळावळ, बदाम, खारका वगैरेचे ढीगच्या ढीग पडूं लागले. ते महाराज आपल्या हातानें लोटून या तिघांकडे लावीत. हा प्रकार पाहून या ति

मोठा आनंद झाला. परंतु संध्याकाळपर्यंत हे तिघे संन्यासी तेथें बसले असतांहि सेवेकऱ्यांनीं त्यांच्या देखत उपटा मारून सर्व जिनसा पळविल्या, आणि त्यांच्या हातीं एकहि पदार्थ लागूं दिला नाहीं. संध्याकाळच्या सुमारास महाराज हांसले आणि तेथून उठून चालते झाले. तेव्हां हे तिघे जण हिरमुष्टी होऊन त्यांनीं ती रात्र कशी तरी तेथें काढली. परंतु दुसऱ्या दिवशीं महाराजांच्या दर्शनास न जातां अक्कलकोटाहून पळ काढून ते निघाले.

वर लिहिलेल्या महाराजांच्या अद्भुत प्रकारच्या वर्तनावरून मार्मिकावांचून त्यांच्या अंतरसाक्षपणाची परीक्षा कोणाला होणार आहे? व्यवहारांत देखील अशी रीत आहे कीं, खरे जे थोर पुरुष आहेत, त्यांना आत्मस्तुति आवडत नाहीं इतकेंच नाहीं, परंतु त्यांची कोणी फाजील स्तुति केली असतां त्यांना ती विषतुल्य वाटत असते. महाराज सरळ बोलत नसत असा तर त्यांजविषयीं लोकांत समज आहे, परंतु मार्मिक रीतीनें पाहिलें असतां ह्या वरील तीन प्रकारच्या उदाहरणांवरून व्यवहारिक रीतीनें चेहरा पाहून मनुष्याची पारख करणें, आणि त्याच्या स्थितीप्रमाणें त्याजबरोबर वर्तन करणें वगैरे गुण महाराजांच्या अंगीं उत्कृष्ट प्रतीचे असल्याविषयीं आपणास विचारांतीं ज्ञान होतें. परंतु दुसऱ्यास व्यामोह उत्पन्न करून आपण जसें कांहीं खरोखर वेडे आहोंत, आणि त्यायोगें अनधिकार मनुष्याची आपल्यावर बसणारी श्रद्धा एकाएकीं उडवून टाकण्याचे, किंवा खरोखर त्याचा आपणाविषयीं भाव आहे हें कसोटीला लावून पहाण्याचें, उत्कृष्ट रीतीचें त्यांजपाशीं साधन होतें. महाराज अक्कलकोटास आल्यावर ४।५ वर्षांनीं एके दिवशीं त्यांनीं अशी कांहीं गंमत केली कीं, त्यांच्या हातांत कोणीं कांहीं एक प्रकारचें बीं असणारें फळ दिलें. तें फळ महाराजांनीं हातांत घेऊन फोडलें, आणि त्यांतली एक बी हातांत घेऊन बाकीचें सर्व फेकून दिलें. पुढें त्या बीबरोबर खेळत असतां ती बी महाराजांनीं आपल्या मूत्रद्वारांत घातली. पुढें ती कांहीं केल्या निघेना. अखेरीस शिश्न सुजून मोठें झालें, तें पाहून महाराज मोठ्यानें पोट धरधरून हांसूं लागले. जवळ असणाऱ्या लोकांस या कृत्याची भीति वाटली, आणि लागलीच त्यांनीं धांवाधांव करून डाक्तरास बोलावून आणलें. डाक्तरानें कांहीं उपचार करून ती बी बाहेर काढली. पुढें सर्व यथास्थित झालें, असा तर आपणा स्वतःविषयीं लोकांना वेडगळपणा दाखवीत. परंतु

हजारों लोकांचे असाध्य रोग महाराजांनीं नुस्त्या सांगण्यानें, किंवा कांहीं तरी उपचार करण्यास सांगण्यानें घालविले आहेत. अशा लोकांपैकीं पुष्कळ अद्याप जिवंत आहेत. रा. रा. विष्णु चिंतामण भोपटकर, पुणे सेशन कोर्टाचे नाझर, यांनीं आपल्या कुटुंबाच्या संबंधानें झालेली हकीकत स्वदस्तुर आह्मांस लिहून दिली तिचा सारांश पुढें दिला आहे:— रा. रा. विष्णु चिंतामण भोपटकर, पुणे डिस्ट्रिक्ट जज्याचे (माजी) शिरस्तेदार—सध्यां नाझर—असतां सन १८६९ सालचे जून महिन्यांत त्यांच्या कुटुंबास कफाचा विकार होऊन फारच क्षीणता प्राप्त झाली: औषधोपायांपैकीं एकादा करावयाचा राहिला होता असें नाहीं. सर्वप्रकारचे उपचार करून पुण्यांतील सर्व वैद्य थकले. परंतु कांहीं केल्या गुण येईना, आणि दिवसेंदिवस त्यांच्या कुटुंबाची स्थिति अधिकाधिक होत जाऊन जागचेजागीं उठवेनासें झालें, त्यामुळें अन्नहि जाईनासें झालें. या अशा कुटुंबाच्या भयंकर झालेल्या स्थितिमुळें भोपटकर अगदीं घाबरून जाऊन त्यांचें चित्त अगदीं अस्थिर होऊन गेलें. आणि त्यांच्या कुटुंबाचा अंतकाळ कोणत्या घटकेस होतो याची ते वाट पहात बसले होते. ईश्वर करणी अगाध होती, आणि स्वामी महाराजांच्या नांवाचा जयजयकार व्हावयाचा होता इतकेंच खरें !!! भोपटकर हे एका दिवशीं संध्याकाळीं आपल्या घरांतील दिवाणखान्यांत एकटेच चिंतातुर बसले असतां त्यांचे स्नेही रा. रा. बळवंतराव भिकाजी ऊर्फ रावसाहेब ढवळे हे आले. आणि उभयतांची भोपटकर यांच्या कुटुंबाच्या संबंधानें विचारपूस झाल्यावर ढवळे यांनीं असें सुचविलें कीं, औषधोपचार तर आतां सर्व होऊन गेले आहेत, परंतु एक उपचार राहिला आहे तो करून पहा. तो हा कीं, आपल्या कुटुंबास जर गुण पडला, तर अक्कलकोट येथें श्री स्वामीमहाराजांच्या दर्शनास त्यांना घेऊन जा; आणि तोंपर्यंत श्री. रा. रा. गणेशशास्त्री साकुरडीकर इनामदार दीक्षित यांचें औषध सुरू करा. भोपटकर यांनीं हो ह्मणून रात्रीं श्री स्वामीसमर्थांची प्रार्थना करून देवाजवळ एक नारळ ठेवण्याचें कबूल केलें. नंतर कांहीं वेळानें ढवळे हे उठून आपल्या घरीं गेले. मनांत योजिल्याप्रमाणें रात्रीं प्रार्थना करून, महाराजांच्या नांवानें नारळ ठेवण्याचें भोपटकर अगदींच विसरून गेले. त्याच रात्रीं असा चमत्कार झाला कीं, भोपटकर यांचे मेव्हणे—कुटुंबाचे बंधु—यांच्या स्वप्नांत महाराजांनीं येऊन सांगितलें कीं, अरे माझ्या नांवानें नारळ ठेवण्याविषयीं कसा विसरलास, इतकेंच स्वप्न

पहाटेच्या सुमारास होऊन ते जागे झाले; आणि हा स्वप्नप्रकार घरांतील सर्व माणसांस सांगून भोपटकर हे निजून उठल्यावर त्यांच्या कानीं घातला. तो ऐकल्याबरोबर भोपटकर यांस विलक्षण प्रकारचें आश्चर्य वाटलें, कारण हे प्रार्थना करण्याचें बोलणें ढवळे व यांच्या वांचून दुसरे कोणासच ठाऊक नव्हतें. या चमत्कारानें ते मनांत फारच दचकले, परंतु यापासून त्यांच्या कुटुंबास बरें होण्याची त्यांना आशा उत्पन्न झाली, आणि लागलेंच ते स्नान केलें, व देवापाशीं बसून महाराजांची त्यांनीं प्रार्थना केली व नारळ ठेवून वायदा केला कीं, कुटुंबाची प्रकृति चांगली झाल्यास येत्या जानेवारी महिन्यांत मी कुटुंबासहवर्तमान अक्कलकोट येथें महाराजांच्या दर्शनास येईन. ही एक गोष्ट झाल्यावर दीक्षित यांचें औषध सुरू करावयाचें होतें, परंतु दीक्षितांची चौकशी करितां ते पुणें येथें नसून साकुरडीस आपल्या इनाम गांवीं गेले असें कळलें. तेव्हां त्यांना मुद्दाम मनुष्य पाठवून आणवावयाचें भोपटकर यांच्या विचारास येईना. कारण कुटुंबाचें प्राणोत्क्रमण कोणत्या वेळेस होईल याचा त्यांना मुळींच भरंवसा नव्हता. तेव्हां हा बेत रहित करून भोपटकर हे नऊ वाजतां जेवण आटपून कचेरींत गेले. त्या दिवशीं सायंकाळीं असा कांहीं अकल्पित योगायोग घडून आला कीं, भोपटकर हे संध्याकाळीं कचेरींतून परत येत असतां नानाच्या वाड्याजवळ त्यांची व दीक्षित यांची अकस्मात गांठ पडली. तेव्हां भोपटकर यांस किती आनंद झाला असेल हें सांगणें नकोच. दीक्षितांनीं भोपटकर यांच्या घरीं जाऊन दुपारींच चौकशी केली होती त्यामुळें औषध न देण्याचा भोपटकर यांनीं विचार केल्याचें त्यांना कळलें असल्यावरून भोपटकर यांच्या गांठीची ते वाटच पहात होते. रस्त्यांत परस्पर एकमेकांची गांठ पडल्यावर उभयतांची औषध न देण्याच्या संबंधानें विनोदपर भाषणें झाल्यावर ईश्वरावर हवाला ठेवून औषध देण्याचा यत्न सुरू ठेवावा असें ठरलें. दीक्षितांनीं औषध देण्याची वगैरे योजना अगोदरच करून ठेविली होती, आणि औषध बरोबर घेऊन ठेवलें असल्यानें भोपटकर यांजबरोबर त्यांच्या घरीं गेल्यावर पुन्हा प्रकृति पाहून रात्रीं भोपटकर यांच्या कुटुंबाला १६ वेळां दोन दोन घटकेनें औषध देण्याच्या कामीं दोन तीन इसमांचीं नेमणुक करून व औषध कसें द्यावें वगैरे त्यांना नीट समजावून देऊन पहिल्या खेपेचें औषध आपण स्वतः दिलें आणि दीक्षित भोपटकर यांच्या घरून गेले. दीक्षितांच्या औषधानें

जोर मारून भोपटकर यांच्या कुटुंबानें यमाजीपंताची चिठ्ठी परतवली असें दुसरे दिवशींच प्रातःकाळीं दिसूं लागलें. तेव्हांपासून भोपटकर यांच्या कुटुंबाला थोडथोडा गुण पडत चालला. जानेवारींत सेशनाकरितां सोलापूर येथें जाण्याची भोपटकर यांची वेळ आली; त्यावेळेस त्यांच्या कुटुंबाची बरीच प्रकृति सुधारली होती, तथापि भोपटकर यांस त्यावेळीं नेण्याचे बरें न वाटून त्यांनीं पुढच्या सेशनाला जातेवेळीं नेण्याचा बेत केला, आणि आपण एकटेच सोलापुरास चालते झाले. भोपटकर हे घरांतून बाहेर पडून आगगाडींत जाऊन बसत तोंपर्यंत त्यांच्या कुटुंबाची प्रकृति ठीक होती, परंतु आगगाडी चालू होऊन भोपटकर हे एकटेच गेले असें झालें मात्र, घरीं त्यांच्या कुटुंबाची प्रकृति अतिशय बिघडून गेली, ती इतकी कीं, भोपटकर यांस दुसरे दिवशीं तार करून पुण्यास बोलावून आणणें भाग पडलें. अदले दिवशीं गाडींत बसेपर्यंत कुटुंबाची प्रकृति ठीक असतां एकाएकीं तार आली, त्याअर्थीं कांहीं तरी विपरीत गोष्ट घडली असेल, किंवा घडण्याचा समय नजीक आला असेल, इतकी कल्पना मनांत येऊन भोपटकर यांची छाती दडपून गेली, आणि काय करावें हें त्यांस सुचेनासें होऊन गेलें. भोपटकर यांनीं लागलीच रजा विचारली, आणि बिऱ्हाडीं आले, व आगगाडीचा शोध केला, परंतु त्यावेळीं माणसांची गाडी जाणारी नसून भोपटकर घरीं आले त्यावेळेस एक मालाची गाडी जाणारी होती. त्या गाडींत दुप्पट हांशील भरून व उघड्या गाडींत बसून जाण्यास ते तयार झाले. परंतु माणसांच्या गाडीपेक्षां मालाची गाडी सुमारें एकच तास आधीं जाऊन पोंचेल, असें पाहून त्यांनीं त्या मालाच्या गाडींत जाण्याचा बेत रहित केला. पुण्यास येण्याचा विचार चालू असतां भोपटकर यांच्या मनांत अशी कल्पना आली कीं, आपल्या कुटुंबास या खेपेस स्वामीदर्शनास आणण्याचा आपण संकल्प केला होता, त्याप्रमाणें करण्यास आपण चुकलों, ह्मणून कदाचित् आपल्या कुटुंबाची अशी स्थिति झाली नसेल ह्मणून कशावरून ! याजकरितां महाराजांपाशीं आपण या घडलेल्या चुकीबद्दल एकवार माफी मागून जुलै महिन्यांत कुटुंबास खचित खचित घेऊन येईन अशी प्रार्थना करून पहावें. ही प्रार्थना होण्याबरोबर त्यांच्या कुटुंबास त्याचवेळेस पुण्यांत गुण पडला असें त्यांस दुसऱ्या दिवशीं स्टेशनावर कळलें. भोपटकर हे प्रार्थना करून आगगाडीवर जाण्याकरितां सोलापुराहून निघाले. गाडींत बसल्यावर गाडी जशजशी पुण्याच्या बाजूनें एकेक मजल

काटीत चालली, तसतशी भोपटकर यांना अधिकाधिक धास्ती पडत चालली. त्यांना असें वाटे कीं, स्टेशनावर उतरतां क्षणीं उत्तरकार्यास आरंभ करण्याकरितांच कोणी जासुद निरोप घेऊन तो मला सांगण्यास उभा असेल, किंवा वेदील झालेलें मन शांत करण्याकरितां प्रकृति बरी आहे असें तो सांगेल, किंवा पहिला संस्कार सर्व आटपला असें सांगेल, वगैरे अनेक प्रकारचे विचार मनांत येऊन त्यांचें चित्त अगदीं गोंधळून गेलें होतें. अशा समयास गाडी पुण्याच्या स्टेशनावर येऊन पोंचली. तेव्हां गाडीच्या गजांतून तोंड बाहेर काढून मोठ्या दुःखित व साशंक मुद्रेनें भोपटकर यांनीं प्लाटफार्मवर आपल्या घरचें कोणी आलें आहे कीं काय ह्मणून उत्कंठेनें पाहिलें. तों त्यांचे चिरंजीव आंगरखा पागोटें घालून व कपाळास तांबडें गंध लावलेले असे त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हां आपल्या चिरंजीवास अशा पोशागानिशीं पहाण्याबरोबर भोपटकर यांस बराच धीर आला असेल हें सांगणें नकोच, परंतु ती वेळपर्यंत कांहीं विपरीत गोष्ट घडून आली नाहीं, असें त्यांस खास वाटलें. गाडींतून उतरल्यावर भोपटकर यांस त्यांच्या चिरंजीवांनीं गेल्या दोन रात्रींची हकीकत कळविली, तिजवरून महाराजांच्या दर्शनास आपण कुटुंबास नेलें नाहीं, याच चुकीमुळें हा अनर्थ घडून आला, अशी त्यांची पक्की खातरी झाली. नंतर घरीं येऊन पोंचल्यावर कुटुंबास सर्व झालेली हकीकत त्यांनीं सांगितली; आणि जुलै महिन्यांत स्वामी दर्शनास खास जाण्याचा उभयतांनीं निश्चय केला. पुढें जुलै महिना आला. त्यावेळेस नेण्यासारिखी भोपटकर यांच्या कुटुंबाची स्थिति नव्हती, तथापि वैद्यराज साकुरडीकर बावा यांचा घरोबा असल्यानें त्यांस बरोबर घेऊन दोन मुक्कामांनीं भोपटकर हे अक्कलकोटास गेले. पहिला मुक्काम सोलापुरास ज्या दिवशीं केला, त्याच दिवशीं भोपटकर हे कुटुंबास बरोबर घेऊन सर्व मंडळीसहवर्तमान दत्तमंदिरांत दत्ताचे दर्शनास गेले. ही सर्व मंडळी देवळांत जाऊन पोंचते इतक्यांत लहान धार मुसळा येवढी असा पाऊस चार घटका एकासारखा येऊन रस्ते पाण्यानें तुडुंब भरून गेले. भोपटकर यांच्या कुटुंबाची प्रकृति बिघडलेली, त्यांत पावसानें जोर करून त्या सर्वांस वाटेंतच भिजवून टाकलेलें, त्यामुळें चार घटका ओलीं पांघरूणें अंगावर झालीं, तशांतून मोठ्या खटपटीनें व आवाई सवाई दाम देऊन भोपटकर यांनीं एक मेणा भाड्यानें आणला. त्यांत कुटुंबाला बसवून उतरल्या ठिकाणीं घेऊन गेले.

तें घर नवीनच बांधलें असल्यानें आधींच ओलें होतें, तशांत त्याजवर पावसानें मेहरबानी केली ! ! मग ओलीस काय विचारावें ? तथापि ती रात्र त्या सर्वांनीं कशी तरी तेथेंच ओल्यांत काढली. चमत्कार हा कीं, भोपटकर यांच्या कुटुंबाची प्रकृति बिघडलेली असतांहि कांहीं एक ज्यास्त न होतां पहिल्याहिपेक्षां ती किंचित् बरी दिसूं लागली. दुसऱ्या दिवशीं तीं सर्व मंडळी पाऊस लागत असतांच अक्कलकोटास चालती झाली. कडपगांवच्या स्टेशनावर गाड्यांचा वगैरे अगोदरच बंदोबस्त करून ठेवल्याकारणानें मंडळी उतरतांक्षणींच गाड्यांत बसून अक्कलकोटास चालती झाली, ती पहिल्यानें नेमलेल्या ठिकाणीं जाऊन उतरली. भोपटकर यांनीं महाराज कोठें आहेत यांचा शोध आणिवण्याकरितां एक मनुष्य धाडला. त्यानें लागलीच बातमी आणली कीं, महाराज नुक्तेच राजवाड्यांत गेले असून जनानखान्यांत बसले आहेत. बाहेर केव्हां येतील याचा नेम नाहीं. ही बातमी ऐकून भोपटकर यांनीं पहिल्यानें आपल्या कुटुंबास एकटेंच पाठविण्याचा विचार केला, इतक्यांत गांवांत कुई पसरली कीं, महाराज जनानखान्याबाहेर आले आहेत. तेव्हां स्त्रीपुरुषांना एकदम जाण्याची आंतां मोकळीक आहे असें मनांत आणून भोपटकर हे सर्व मंडळीसहवर्तमान निघाले. वाड्यांत गेल्यावर महाराजांचें दर्शन अनुक्रमें त्यांनीं असें घेतलें कीं, प्रथमतः भोपटकर यांचें कुटुंब पुढें गेलें. भोपटकर यांच्या कुटुंबास पहाण्याबरोबर महाराजांनीं आपले पाय लांब केले. त्यांतील आशय इतकाच दिसून आला कीं, भोपटकर यांच्या कुटुंबास महाराजांच्या चरणांचें यथार्थ दर्शन घेतां यावें. दुसऱ्यानें वैद्यराज दीक्षित गेले. दीक्षितांना पाहून महाराज आपल्याशींच बोलले " साकुरडीचे गणपती बाबा" यांतील आशय इतकाच कीं, दीक्षित हे गणपत्युपासक आहेत. दीक्षित कांहीं एक न बोलतां महाराजांचें दर्शन घेऊन त्यांच्या उजव्या बाजूस दोन हातांवर बसले. तिसऱ्यानें बरोबरचा एकजण जाऊन चौथ्यानें भोपटकर हे गेले, व दर्शन घेऊन दीक्षितांच्या शेजारी मध्यें एक सोडून बसले. महाराजांनीं इतक्यांत आज्ञा केली, " अरे ग्रंथ आणा " हे शब्द ऐकण्याबरोबर चोळाप्पानें एक पोथी आणली. ती महाराजांनीं हातीं घेऊन सर्व अध्याय चाळले, आणि त्यांतील एक अध्याय हातांत घेऊन तो दीक्षितांच्या हातीं दिला. दीक्षितांनीं तो अध्याय हातांत घेऊन उघडून पाहिला, आणि त्याला नमस्कार करून तो पुन्हा महाराजांच्या स्वाधीन

केला. पुन्हा महाराजांनीं सगळे अध्याय चाळून पोथी बांधली, आणि भोपटकर यांच्याच नेमकी हातांत दिली. भोपटकर यांनीं दीक्षितांप्रमाणेंच पोथीला नमस्कार करून महाराजांच्या पुढें ठेविली. इतकी कवाईत करून महाराज आंत उठून गेले. या कवाईतींत महाराजांनीं काय सुचविले हें भोपटकर किंवा दीक्षित यांस कांहीं कळलें नाहीं, परंतु चोळाप्पानें त्यांना असें सांगितलें कीं, हा हरिविजय ग्रंथ आहे, आणि तो महाराजांनीं तुमच्या हातांत दिला, त्या अर्थीं तुमचें कार्य झालें, असें महाराजांनीं तुह्मांस सुचविलें. हे चोळाप्पाच्या तोंडचे शब्द भोपटकर यांनीं ऐकल्याबरोबर त्यांस मोठाच आनंद झाला आणि सर्व उठून बिऱ्हाडीं गेले. दुसऱ्या दिवशीं भोपटकर यांच्या कुटुंबानें महाराजांस स्वहस्तें नैवेद्य तयार करून नेला, तो महाराजांनीं भक्तीनें ग्रहण केला. तिसऱ्या दिवशीं भोपटकर हे महाराजांचें दर्शन घेऊन परतले. पुढें एक महिन्यांत त्यांच्या कुटुंबास चांगलाच गुण आला, व तेव्हांपासून प्रकृति निरोगी होऊन अजूनपर्यंत कायम आहे.

शके १७९१ आषाढ मासांतील दुसरी एक अपूर्व गोष्ट पुणें येथील श्रीमंत गंगाभागिरथी उमाबाई साहेब रास्ते यांनीं आपल्या भाचीची सांगितली. ती अशी कीं, वज्रचुडेमंडित सौभाग्यवती चिमाताई यांचा रा० रा० रामचंद्र नारायण नगरकर यांजबरोबर विवाह झाल्यावर चिमाताईच्या डोळ्यांस सारा येऊन दोन्ही डोळ्यांनीं ६ वर्षेपर्यंत दिवस किंवा रात्र समजेनासें होऊन गेलें, त्यामुळें या सहा वर्षांच्या मुदतींत चिमाताईच्या डोळ्यांनिमित्त त्यांनीं हजारो रुपये खर्च केले, आणि मराठी वैद्य व इंग्रजी डाक्तर या सर्वांचे उपाय हरल्यावर चिमाताईचे डोळे आतां येत नाहींत अशी त्यांचीच काय परंतु पुण्यांतील नामांकित वैद्यांची व डाक्तरांची खातरी होऊन गेली. अखेरीस त्यांना हा शेवटला उपाय सुचला. तो हा कीं, अक्कलकोटास श्री स्वामीसमर्थ आहेत, त्यांच्या दर्शनानें चिमाताईच्या डोळ्यांस गुण आल्यास पहावें. या हेतूनें चिमाताईस घेऊन व बरोबर एक कारकून व हुजऱ्या आणि एक ब्राह्मण घेऊन उमाबाई साहेब ह्या अक्कलकोटास जाऊन पोंचल्यावर चिमाताईस बरोबर घेऊन महाराजांचा शोध करीत करीत, ते ज्या ठिकाणीं बसले होते त्या ठिकाणीं गेल्या. बरोबर कारकून होताच. कारकुनानें महाराजांची प्रार्थना केली कीं, या मुलीचे डोळे आज सहा वर्षे गेले आहेत, तिजकडे कृ-

पावलोकन करून तिला डोळे द्यावे. असें कारकुनानें ह्मणण्याबरोबर महाराजांनीं "काय पाहिजे" ह्मणून विचारलें. चिमाताई ह्या अज्ञानच, परंतु धीट स्वभावाच्या असल्यानें महाराजांच्या प्रश्नाचें उत्तर त्यांनींच स्वत: असें दिलें कीं, "काय पाहिजे ह्मणजे डोळे पाहिजेत." हें ऐकून दयाळू महाराज हांसले, आणि त्यांनीं तिला असें सांगितलें कीं; यांत काय आहे, म्यां म्यां करतें त्याचें दूध डोळ्यांत घाल आणि सात दिवस पी ह्मणजे डोळे येतील. नंतर ही सर्व मंडळी दर्शन करून पुण्यांत आल्यावर या उपायानें चिमाताईस सातवे दिवशीं दिसूं लागलें. तेव्हांपासून त्यांच्या डोळ्यांची अगदीं विकृति मोडून गेली आहे. आणि हा चमत्कार पाहून तेथील ज्या डाक्तर व वैद्य लोकांनीं औषधोपचार केले होते त्यांस फारच आश्चर्य वाटलें.

तिसरी गोष्ट श्रीमंत अप्पा साहेब भोंसले राजे सावंतवाडीकर सद्ध्या वस्ती महाड यांजकडून लिहून आली ती जशीच्या तशीच दिली आहे. शके १७९२ प्रजापती नाम संवत्सरांत कुटुंबपरिवारासह श्री पांडुरंगाचे दर्शनास मी पंढरपुरीं गेलों होतों. आमचे आप्त चिंचलीकर देसाई यांच्या आमंत्रणावरून कुटुंब व मुलें यांची रवानगी त्यांजकडे केली आणि दोन शिपाई बरोबर घेऊन मोहोळच्या स्टेशनावरून मी कडपगांवास गेलों. तेथें टांगा करून अक्कलकोट शहरीं दाखल झालों. परंतु त्या प्रदेशांत पूर्वीं कधीं जाणें येणें नसल्यानें उतरावें कोठें याचा विचार पडला होता. इतक्यांत टांगेवाल्यानें गाडी कोणाच्या घरीं न्यावयाची असें विचारल्यावरून त्याच विचारांत आह्मी आहों ह्मणून त्यास सांगितलें. गाडीवाला बोलला, असें आहे, तर मी तुह्मांस चांगल्या जागीं उतरण्यास नेतों, असें ह्मणून तो रा० व्यंकटशास्त्री यांच्या घरीं गाडी घेऊन गेला. परंतु शास्त्रीबावा घरीं नव्हते, तथापि त्यांच्या मातोश्रींनीं आमचा आदर केला. त्या दिवशीं उदगयनसंक्रमणपर्वणी होती. मी स्नान करतों इतक्यांत शास्त्रीबोवा घरीं आले. त्यांनीं आमच्याबद्दल चौकशी वगैरे केल्यावर त्यांस दक्षणा दिली आणि शिपाई बरोबर घेऊन प्रभूच्या दर्शनास चोळाप्पाच्या वाड्यांत मी गेलों तेथें दरवाज्यांत मेवा मिठाईचीं दुकानें व हारतुरे घेऊन माळी लोक तयारच आहेत असें पाहून त्या देवाळ्याचा थाट पंढरीच्या महाद्वारापेक्षांहि विशेष भासला. नंतर श्रीफळ व पुष्पहार घेऊन आंत गेलों. महाराज तिसऱ्या सोप्यांत उत्तराभिमुख पलं-

गावर बसले होते. ती मूर्ति अवलोकन करून कंठ सद्गदित झाला. साष्टांग नमस्कार घालून महाराजांचे दृढ चरण धरिले. नंतर ध्यान व स्तोत्रपाठ करीत हात जोडून पुढें उभा राहिलों त्या दिवशीं पर्वणी असल्यामुळें आ-र्ती, व पूजासाहित्ययुक्त अशा स्त्रियांचा समुदाय बराच जमला होता. त्यापैकीं एक बाई पूजार्ती करून शर्करायुक्त तीळ महाराजांच्या हातांत देऊन बोलली कीं, हे तीळ माझ्या हातचे शेवटचे आहेत, मला आतां अहेवपणीं चरणाजवळ न्यावें. त्यावर प्रभूंनीं उत्तर दिलें कीं, बोडकी झालीस तर पोळ्या भाजण्याच्या उपयोगीं पडशील. त्या बाईनें तीळ ग्रहण करण्याविषयीं विशेष आग्रह केल्यावरून मजकडे पाहून "इदरआव, ये लेव, खाकर खुष रहो" असें ह्मणून त्या बाईस जाण्यास सांगितलें. जवळ चोळाप्पाचा जामात श्रीपाद होता. त्याणें मला प्रसाद दिल्यावर महाराज बोलले "क्यंव दिलगीर, शक्कर खाव." त्या समयीं महा-राजांपाशीं अनेक प्रकारच्या खेळाच्या वस्तू होत्या. नंतर कांहीं वेळानें महाराजांस वंदन करून निघालों. आणि शिपायाकडून शिधा आणवून शास्त्रीबावां-च्या मातोश्रीस स्वयंपाक करून घालण्याविषयीं सुचवावें, परंतु अपरिचित यास्तव बाई कबूल करील हा वानवाच. बरें नाहीं ह्मटल्यास एक रजक, व एक मराठा असे दोनच कायते आपल्या बरोबर पट्टेवाले आहेत. होईल तसें पाहूं अशा विचारांत होतों. इतक्यांत वाटारकर लिंबाळकर यांचे कारकून रा. नारोपंत साळविणकर हे तेथें (सद्या कैलासवासी) श्रीमंत मालोजीराव राजे यांची जेष्ठ पत्नी श्रीमंत लक्ष्मीबाई राणीसाहेब यांच्या सरफराजी-करितां माहेरच्या संबंधानें होते, त्यांची वाटेंत अकस्मात गांठ पडली. त्यानीं मुजरा करून आमच्या येण्याची व उतरण्याची वगैरे विनंतीरूप विचारपूस केल्यावर सर्व खटल्यानिशीं श्रीपंढरपुरास आल्याचें वर्तमान मा वशीबाईकडून राणीसाहेबांस लिहून आलें आहे व आपली सरफराजी ठेवण्याविषयीं मला राणीसाहेबांचा हुकूम झाला आहे. असें त्यानीं सांगितलें. राणीसाहेब ह्या आमच्या श्वशुरांच्या भगिनी, यामुळें त्यांस आमचें अगत्य विशेष, परंतु माझ्या मनांत फक्त प्रभुचरणदर्शनाचा अपू-र्व हेतु होता, यामुळें हा संबंध माझ्या मनांत मुळींच वागत नव्हता. असो; नारोपंत यानीं लागलीच दरबारांत खबर पोंचविली. त्यावरून वांकनीस याजकडून मुदपाक्यांकरवीं पंच पक्वान्नांहि युक्त अशीं ताटें वाढून येतांच मी जी काळजी करीत होतों, ती प्रभूंनीं दूर केली, असें मनांत येऊन

प्रभुचरणांचें स्मरण झालें. नंतर भोजनोत्तर चार वाजण्याच्या सुमारास पुन्हां दर्शनास गेलों. त्यासमयीं किर्तनसमारंभ चालला असून हजारों लोकांचा समुदाय जमला आहे व महाराजांची स्वारी पलंगावर भरजरी पोशाग करून बसली आहे, सेवकजन छत्रचामरें घेऊन चवऱ्या मोर्चेल वारीत आहेत. असें अवलोकन करितांच चरणांसान्निध युक्ती प्रयुक्तीनें प्रवेश करून वंदनकरून उभा राहिलों. इतक्यांत स्वामीमहाराजांनीं मजकडे पाहून ह्मटलें कीं, "आधीं पोटोबा, मग विठोबा" आज जेवण यथेच्छ परभारें मिळालें आहेना? आतां स्वस्थपणें कथा ऐकत बैस. अशी आज्ञा श्रवण करून सायंकाळपावेतों कीर्तन श्रवण करीत बसलों. कीर्तनांतीं आर्तीचा थाट मोठा झाला. तो देखावा फारच मनोवेधक असून दुष्टमनुष्याची दुष्टवृत्तिहि क्षणमात्र नष्ट व्हावी असा होता. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं प्रभुचरणांची आज्ञा घेऊन निघाल्यावर वाड्यांतून पाचारण आलें होतें. सबब तिकडे जाऊन राणीसाहेबांची भेट घेतली, आणि निघालों. राणीसाहेबांनीं स्टेशनपावेतों जाण्यास रथ दिला होता. महाराजांचें दर्शन पुन्हां कधीं होईल याविषयीं मनास मोठा चटका लागला होता. परंतु प्रपंच दक्ष अशा पातक्यांस स्वामींचा नित्य समागम कशानें घडणार? ज्यांस प्रभुचरणसरोरुहांचा नित्य समागम घडला गेला त्या अक्कलकोटवासी जनांचें केवढें बरें थोर प्रारब्ध! नंतर पुन्हा शके १७९५ सालीं मार्गशीर्षमाशीं गेलों होतों, त्यासमयीं पूर्वींच्याच जागीं उतरलों होतों. परंतु सर्व तजवीज राणीसाहेब यांजकडून लागत असे. महाराज चोळाप्पाच्या वाड्यांत नसून राजवाड्यासंनिध कुंभारआळींत रहात होते. सर्व बंदोबस्त व व्यवस्था राजवाड्यांतून होत असून त्या समयीं सुंद्राबाईचें प्राबल्य विशेष असे. दोन दिवस प्रभुचरणाचें दास्यत्व करून निघून आलों. नंतर स्वामीदर्शनास मला घेऊन चलावें असा कुटुंबाचा आग्रह पडल्यावरून आणि माझ्या डाव्या पायास कांहीं रोगानें १०।१५ ठिकाणीं छिद्रें पडलीं होतीं, तीं अनेक औषधोपचार केले, परंतु बरीं झालीं नाहींत, तरी हा रोग प्रभुकृपामृतदृष्टीनें बरा होईल असा दृढ हेतु अंतःकरणांत धारण करून कुटुंबसुद्धां रेल्वेमार्गानें दर्शनास येण्यास निघालों. पूर्वीं सुचविल्यावरून राणीसाहेब यांणीं स्टेशनावर रथ, म्याना, व चार शिपाई ठेविले होतेच त्यांसह ग्रामांत प्रवेश केला. इतक्यांत राणीसाहेबांच्या खासगींतील रामजी भोंसला या नांवाचा एक वया-

तींत नोकर भेटला. तो असें ह्मणाला, कीं, आज तीन दिवस महाराज वागदरीचे डोंगरांत गेले आहेत, तेव्हां तेथें ग्याना घोडा वगैरे जाण्यास सोय नाहीं. हे शब्द कानीं पडतांच चित्तास फारच खेद होऊन हर! हर! प्रभूंनीं या अनाथाची कां बरें उपेक्षा केली असावी अशाविषयीं महाचिंता प्राप्त होऊन कुटुंबास कसें दर्शन होईल असा विचार करीत करीत राजवाड्याजवळ येऊन ठेपलों. कुटुंब समागमें होतें सबब नेहमींच्या बिऱ्हाडीं उतरण्यास राणीसाहेबांची आज्ञा नसल्यानें संस्थानचालीप्रमाणें श्रीगणपतिमंदिरांत उतरलों. आणि कुटुंब राजवाड्यांत उतरण्यास राणीसाहेब यांजकडे गेलें. इतकें लांब आल्याप्रमाणें सार्थक्य होत नाहीं, अशा विवंचनेंत होतों, तथापि स्नानाची तयारी होतांच स्नान उरकून गणपतिमंदिरांत बसलों आहें इतक्यांत भुजंगअप्पा विंचुरकर यांजकडून चवरी वारण्यास व बंदोबस्तास असणारा चपराशी तेथें आला. त्याची आणि माझी पूर्वींची ओळख होतीच. त्यानें मला पाहून राजेसाहेब केव्हां येणें झालें, व आज इकडे कां उतरला असें विचारलें. त्याजवरून मी त्यास उत्तर दिलें कीं, कुटुंबसह आलों आहे, सबब राणीसाहेबांच्या मर्जीप्रमाणें वागणें भाग आहे. परंतु आमचें येणें व्यर्थ झालें, कारण स्वामीमहाराज आज तीन दिवस येथें नाहींत, आतां कधीं दर्शन होईल तो सुदीन, मला कांहींच सुचत नसून माझी हिम्मत खचली गेली. हें भाषण ऐकून तो ह्मणाला दिलगीर होऊं नका. (निश्चयाचेंबळ, तुकाह्मणे तेंची फळ) महाराज आतांच शहाबागेंत आले आहेत. हे अमृत शब्द श्रवण करून चित्तास परम अल्हाद झाला त्याचें वर्णनहि करवत नाहीं. शिपाई ह्मणाला, खारागी कारभारी यांस कळवून घोडा आणवितों, परंतु महाराजांचे दर्शनाच्या अती उत्कंठेमुळें आह्मास इतका अवकाश कसा सहन होणार! जेष्ठमासांतील कडक उन्हाळा असून वारावाहून गेले असतांहि एक कोस लांब पाय चालीनेंच निघालों तथापि बिलकुल श्रम झालेसें वाटलें नाहींत. बागेंतील बंगल्यासमोर हल्लींच्या समाधिसन्निद्ध असलेल्या वट वृक्षाजवळच स्वारी पलंगावर बसली होती. ३।४ दिवस स्वारी गांवांत नसल्यामुळें सर्व यात्रेकरू लोकांची दर्शनास एकच समयावच्छेदेंकरून गर्दी जमली होती. इतक्यांत हा चरणरज पामर दासानुदास श्रीफळ, माळ अर्पण करून स्तोत्रपाठ करीत करसंपुट जोडून उभा राहिला. एक

मुका ब्राह्मण १२ वर्षे स्वामी सेवा करीत होता त्यास शके १७९८ चे माघ मासीं महाशिवरात्रीस तांबुल खावयास देतांच तो बृहस्पतिसारखें बोलूं लागला, हा चमत्कार आह्मी स्वतां पाहिला, अहो प्रभू काय करणार नाहींत!! प्रभू लीलाच तशी (मूकंकरोतिवाचालं ॥ पंगूलंघयतेगिरीन् ॥ यत्कृपातमहंवंदे ॥ परमानंद माधवं) त्या ब्राह्मणास मोठे व्याघ्रचर्मांबर आणण्यास सांगित्ल्य, वरून त्याणें तें तत्काळ आणून पसरतांच मला हस्तसंकेत करून बसण्यास सांगितलें. प्रभू आज्ञा खरी तथापि त्यांच्या आसनास स्पर्श करणें उचित नव्हे असा विचारकरून आसनास वंदन मात्र केलें. हें पाहून स्वामींनीं बैठरे बैठ असें धमकावून सांगितलें, तरीहि मी करसंपुट जोडून तसाच उभा होतों. इतक्यांत महाराजांनीं समोरच्या कुपणांतील कुंदाच्या वाळले, त्या गवताच्या मुळ्या उपटून आणण्यास भुजंगा चपराशी यास सांगित- ल्यावरून त्यानें त्या आणून महाराजांच्या स्वाधीन केल्या, त्या हातांत घेऊन मजकडे पाहून ह्मणालें, इकडे ये, तुझ्या पायास किती भोंके पडलीं आहेत तीं पाहूं. हें तुझ्या वाईट आचरणाचें फळ वगैरे गालिप्रदान प्रसादरूप भाषणें बोलून सांगितलें कीं, पायाच्या रोगास औषधोपाय करून दमलास, आतां हें औषध उगाळून पीत जा आणि हस्तिदंत उगाळून पायास लेप कर, असें बोलून जवळ आंब्याची पांटी भरली होती, तींतील ५ आंबे, तसेंच एक श्रीफळ, ५ चिंचोके व ५ खारका उचलून माझ्या पदरांत घातल्या. आणि मी उभा असतां मला हात धरून खालीं बसविलें व ह्मणालें आह्मास गादी गिरद्या व धोतर जोडा रंगित कशास आणिलास? तुझी गादी तुला, आमचें चर्मासन आह्माला. तूं कोठें आमच्या आसनावर बसतोस? या भाषणाचा अर्थ फारच मार्मिक, व गहन होता त्याचा शब्दार्थ करूनच समाधान मानावें. असो मी सायंकाळीं आर्तीचा समारंभ होईपर्यंत चरणाजवळ होतों. नंतर अल्पमात्र पादसेवा करून आज्ञा घेऊन बिऱ्हाडीं आलों. दुसऱ्या दिवशीं कुटुंबासह दर्शनास गेलों. त्यासमयीं राणीसाहेबांनीं म्याना, पडदे अशा राजकीय थाटानें रवानगी केली. परंतु तो प्रकार मला आवडला नाहीं, कारण आह्मी आपल्या मनांत इतका जो अनन्यभावें शरण जाण्याचा हेतु धरून इतके लांब आलों, तो अनन्यभाव प्रदर्शित होण्याचा हा प्रकार नव्हे. तथापि आह्मी राजकुलोत्पन्न असून राजमंदिरीं उतरलों तस्मात् त्यांच्या मर्जीप्रमाणें वागणें भाग आहे. असो, या थाटानें शहाबागेंत जाऊन पोंचताच प्रभूंनीं म्याना अवलोकन करून परम क्रोधाविष्ट होत्साते गालि-

प्रदानास आरंभ केला, आणि स्वारी पलंगावरून उठून पळून जाऊं लागली. मी मागोमाग चर्मपादुका व छत्री घेऊन निघालों; व आणखी चोळाप्पा व २ पट्टेवाले व कांहीं सेवेकरी आसन वगैरे सामान घेऊन निघाले. इतक्या अवकाशांत स्वारी एक मैल लांब एका निवडुंगाच्या बेटांत जाऊन बसली. तेथें सर्व तजवीज लागली. मी कुटुंबास म्याना सोडून महाराज जातील तेथपर्यंत पायींच दर्शनास चलावें असें सांगितल्यावरून तीहि त्या स्थलीं आली. नंतर उभयतांनीं पादपूजा करून धोतर जोडा अंगावर घालून गादी व गिर्द्या नेल्या होत्या त्या तेथें ठेविल्या. प्रभूंनीं दोन श्रीफळें माझ्या हातांत दिलीं, व बोलले कीं, आह्मी हिला दर्शन देण्याकरितां इतके लांब आलों असून हिच्यानें म्यान्यावांचून दर्शनास येववत नाहीं काय? असें बोलून गळ्यांतील पुष्पहार काढून तिला देऊन जाण्याचा हुकूम करतांच कुटुंबाची रवानगी बिऱ्हाडीं करून दिली आणि नैवेद्याची कशी तजवीज करावी असा विचार करीत उभा होतों. इतक्यांत स्वारी चालती झाली. त्यांच्या बरोबर कांहीं आनंदाचीं भाषणें करीत करीत मी व चोळाप्पा बरोबर चाललों असतां स्वारी बागेंतील मोटेच्या विहिरीवर येऊन बसली, आणि मला तांब्या भरून पाणी आणण्यास सांगितलें. मी त्वरेनें विहिरींतून तांब्या भरून आणिला आणि थोडा नैवेद्य ग्रहण करण्याविषयीं चोळाप्पाकडून विनंती करवितांच प्रभूंनीं तांब्या फेंकून देऊन क्रोधाविष्ट झाले आणि पूर्वस्थानीं पलंगावर येऊन बसले. चोळाप्पा व मी संनिध असून राणी साहेबांकडील मुत्पाकी ताट घेऊन जवळ होताच. इतक्यांत स्वारी दिलेल्या वस्त्रांपैकीं एक वस्त्र पांघरून निजली. आह्मी पलंगाजवळ उभे होतों. एका कलाकानें मुखावरील वस्त्र काढून मजकडे पाहिलें; आणि "अरे गाढवा, उगीच का उपाशी मरतोस? निकल जा बाहेर" असें बोलले, तेव्हां मी अशी विनंती केली कीं, आज प्रभूंनीं कांहींच ग्रहण केलें नाहीं, व मी आणिलेला नैवेद्यहि तसाच आहे, त्यापेक्षां आपल्यास नैवेद्य समर्पण करून उच्छिष्ट प्रसाद ग्रहण केल्यावांचून भोजन करावयाचें नाहीं असा मी निश्चय केला आहे. हें ऐकतांच स्वारी उठली व चोळाप्पास तयारी करण्यास सांगितलें. इतक्यांत सभोंवती कनाथी व पडदे लावून नैवेद्य समर्पण केला. प्रभूंनीं सर्व पदार्थ भक्षण करून कांहीं प्रसादाकरितां ठेविले. भोजन होतांच मुखमार्जन करून माझ्या हातचें तांबूल ग्रहण केलें. नंतर प्रसाद घेऊन आज्ञा होतांच मी निघून बिऱ्हाडीं आलों तों चार वाजण्याचा

समय झाला. तोंपर्यंत राणीसाहेब मजकरितां भोजनास खोळंबल्या होत्या. प्रभूंनीं दिलेला अमृततुल्य प्रसाद सर्वांस देऊन मीहि मोठ्या प्रेमानें ग्रहण केला, व थोडा मुलांकरितां घरीं आणिला. प्रातःकाळीं महाराजांस स्नान घालणें, पूजेच्या व आर्तीच्या समारंभास हजिर असणें, सायंकाळीं धूपार्तीस जाणें, अशाप्रकारें ९ अहोरात्री महा आनंदांत घालविल्या. असा क्रम चालत असतां अधिक ज्येष्ठ शु० १२ प्रदोष गुरुवार त्या दिवशीं प्रभूंना प्रातःकाळीं स्नान घालून तीर्थ ग्रहण केल्यानंतर महाराज पलंगावर जाऊन बसल्यावर केशर चंदनादिक सुगंधद्रव्यपूजा अर्पण झाली. गीत वाद्य चौघडा चालून मोठ्या समारंभानें आर्ती केली. त्यासमयीं महाराजांच्या संनिध पलंगावर पादुका वर शिवयंत्र काढिलेल्या होत्या. अनेक प्रकारच्या लीला भक्तांस दाखविणाऱ्या प्रभूंनीं त्या पादुकांची पुष्पें वगैरे वाहून पूजा केली आणि मजकडे पाहून ह्मणाले, ह्या घे, रोजरोज त्रास देऊं नको. तुझें खेडेगांव तूं घे, तें आह्माला कशाला पाहिजे? असें ह्मणून पादुका उचलून मला दिल्या. त्या मी महाप्रसाद ह्मणून अत्यादरें व अत्यानंदें ग्रहण केल्या. जवळ चोळाप्पा वगैरे मंडळी होती त्या सर्वांहीं जयजयकार करून "धन्य भाग्य तुमचें, आज तुमचे सर्व श्रमाचें साफल्य झालें" असें ह्मटलें. नंतर दुसऱ्या दिवशीं आह्मी निघून जाणार तों त्याच दिवशीं स्वारी अकस्मात वाड्यांत आली. पूर्वीं बरेच महिने स्वारी वाड्यांत गेली नसून राणीसाहेबांनीं एकदोन वेळां पालखीहि पाठविली तथापि महाराज आले नाहींत. आणि त्याच दिवशीं स्वारी आली तेणेंकरून आमच्या कुटुंबास परमानंद होऊन चरणसेवा करूं लागली, तों महाराजांनीं एक श्रीमुखांत भडकावून गालिप्रदानास आरंभ केला, आणि ह्मणाले कीं, "तूं क्षारसमुद्रतटाकीं रहात असून आह्मांस खारे मत्स्य कां आणिले नाहींस?" असें ह्मणून एक ताटभर हरभरे आणण्यास सेवक जनांस आज्ञा केली. सेवकांहीं हरभरे ताटांत आणिल्यावर त्यांतील तीन मुठी हरभरे कुटुंबाच्या पदरांत घातले. नंतर भोजनोत्तर निघून येण्याचे समयास मी दर्शनास गेलों, त्यासमयीं स्वारी वाड्याच्या आंतील चौकांतील वृंदावनासंनिध औदुंबराच्या पारावर बसली होती. पूर्व संकेताप्रमाणें हातांत असलेला हस्तिदंताचा तुकडा होता तो माझ्या अंगावर झुगारला, तो मी अत्यादरें ग्रहण करून तीन प्रदक्षिणा करून प्रेमयुक्त अंतःकरणानें वंदन केलें, आणि कुटुंबसह आज्ञा घेऊन निघालों. त्यासमयीं स्वामींच्या च-

राजवियोगाचें अतिशय दुःख वाटलें. राणीसाहेबांनीं रथ म्याना देऊन नारो-पंत यांस स्टेशनापावेतो पोंचविण्यास पाठविले होते. या वेळीं प्रभूनीं मजला ज्या कांहीं प्रसादरूपी वस्तु दिल्या त्यांमुळें मनाची अशी दृढतर भावना झाली कीं, स्वामींनीं चिंतोपंत अप्पा टोळ यांच्या कोट तुळशी-अर्पणाकरितां पूजेच्या पाटावर सचिन्ह पादुकांची अक्षय तजवीज ठेवि-ली आहे, (तो पाट गणपतराव जोशी यांच्या वाड्यांत सांप्रत पूजेस आहे,) तद्वत् या दीनावर कृपादृष्टि होऊन स्वामींनीं हा महत् अनुग्रह के-ला एतद्विषयीं मोठी धन्यता वाटली.

वर सांगितलेल्या हकीकतीवरून महाराजांस झालेला सामान्य रोग दुस-ऱ्यांनीं औषध देऊन बरा करावा, आणि दुसऱ्यांचे असाध्य झालेले रोग महाराजांनीं नुस्त्या आपल्या कांहीं तरी सांगण्यानें बरे करावे असे प्रकार लोकांच्या वारंवार दृष्टीस पडत असल्यानें कित्येक उपासनामार्गांत प्रवीण असणाऱ्या सद्भक्तांस देखील महाराजांच्या पूर्णावताराविषयीं भ्रांति पडली होती, मग आधींच वाचाळ, आणि तशांत राजविद्येचा अल्प स्वल्प किंवा भरपूर संस्कार झालेल्या आणि चार पैसे, मग ते आर्जवानें कां होईनात, मि-ळविणाऱ्या लोकांना त्यांच्या उडत्या पहाणीनें महाराजांच्या पूर्णावतारा-विषयीं भ्रांति झाली असेल, किंवा अजून होईल, यांत फारसें नवल तें को-णतें? अदमासें १९ वर्षांच्या पूर्वींची एक गोष्ट अशी आहे कीं, वे. शा. सं. रा. रा. गोपाळ जोशी या नांवाचे कोणी एक गृहस्थ अक्कलकोट येथें रहात होते. हे जोशीबावा वेदांतशास्त्रांत ज्ञाते असून गणपतीची मानसपू-जा करणारे असत. या दोन गोष्टींचा ह्मणजे वेदांताचा आणि दुसरा मानसपूजेचा डौल वाहणारे हे असल्यानें ते महाराजांस वेडे ह्मणत, आणि त्या समजुतीनें त्यांनीं महाराजांस, महाराज अक्कलकोटास गेल्यापासून कधीं-हि नुस्ता नमस्कार वाटेनें भेटले असतां केला नव्हता, मग त्यांच्याकडे जाण्याचें तर नांवच नको होतें. अशा बाण्यानें हे जोशीबावा वागणारे होते. तथापि एकहि शब्द बोलल्यावांचून महाराजांनीं जोशीबावांची खोड मोडली; तेव्हां जोशीबावा हे निरभिमानपणानें महाराजांच्या दर्शनास प्रत्य-हीं जाऊं लागले. तो चमत्कार असा झाला कीं, नित्य नियमाप्रमाणें जोशीबावा हे गणपतीची मानसपूजा करीत ध्यानस्थ बसले असतां एका दिवशीं महाराज तेथें जाऊन बसले. इतक्यांत जोशीबावांचा ध्या-नविसर्जन करण्याचा काळ आला त्याबरोबर जोशीबावांनीं मनांत ह्म-

णण्याचे पूर्वीच महाराजांनीं " हरयेनमः " असा मोठ्यानें शद्बोच्चार केला. तों ऐकून जोशीबावा डोळे उघडून पहातात, तों ज्यांस आपण वेडे ह्मणून ह्मणतों त्या समर्थांची ही स्वारी आहे. त्यांना पाहून त्यांच्या अंतःकरणास अतिशय विस्मय व आनंद झाला, आणि लागलेंच पूजेंतून उठून महाराजांचे पाय त्यांनीं आधीं घट्ट धरले, आणि उंच स्वरानें अज्ञानामुळें घडलेल्या अपराधांची दीन स्वरानें क्षमा मागितली. हा चमत्कार दाखवून महाराज कांहीं एक न बोलतां तेथून उठून चालते झाले.

अशा प्रकारच्या महाराजांच्या अंगीं अनेक कृति प्रत्येक क्षणीं खेळत्या असल्यानें सरासरी मनुष्यास त्यांचा ठावच लागण्याचें फार कठीण होतें. फार तर काय, परंतु ईश्वरप्राप्ति करून घेण्याकरितां ज्यांनीं आपले देह व सर्व आयुष्य खर्ची घालून अनेक देशपर्यटनें केलीं, व रानोमाळ राहून ऐहिक सुखाचा खरोखर त्याग केला, त्या पुरुषांना देखील महाराजांचें खरें स्वरूप ओळखून काढण्याकरितां जिवापलिकडे पराकाष्टाच करावी लागत असे. संन्याशी, बैरागी, कानफांटे, फकीर, इत्यादि विरक्त झालेले देवदास उपदेश घेण्याच्या उद्देशानें, किंवा सेवा करण्याच्या इरादानें, किंवा दर्शनानिमित्त, किंवा महाराज खरोखर पूर्णावतार परब्रह्मरूप होतें, हें पहाण्याच्या हेतूनें हजारो लोक येऊन गेले, तथापि कोण कोणत्या हेतूनें येऊन गेला याचा कांहींच शोध लागत नाहीं. सुमारें ६ वर्षांच्या पलीकडची एक गोष्ट आहे. एक कानफांट्या, नाथ सांप्रदायी, बरोबरच्या शिष्य परिवारासहवर्तमान अक्कलकोट येथें श्री स्वामीसमर्थांस पहाण्याच्या उद्देशानें प्रथम गेला होता. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर काय त्याच्या मनांत आलें असेल तें येवो. त्यानें आपल्या सर्व शिष्यांस लावून देऊन आपण महाराजांची सेवा करण्याकरितां एकटा राहिला. त्यानें जी सेवा चालविली ती फारच अघोरी होती. महाराजांच्या समक्ष तो कधींच बसला नाहीं, व त्यानें अन्न, पाणी, किंवा फलमूळ इत्यादि खाण्यापिण्याचे सर्व पदार्थ वर्ज करून काय आहार तो महाराजांच्या विष्ठेवर ठेवला होता, आणि महाराजांची लघवी पिऊन तृषा शांत करावी असा नेम धरल्याचें दिसत होतें. महाराजांच्या सेवेंत सदा सर्वकाळ तत्पर रहाण्याकरितां पंचमार्फत चाकर लोक ठेवलेले होते, व दुसरे सेवेकरीहि पुष्कळ असत, परंतु अंतःकरणपूर्वक महाराजांची सेवा कर-

णारा कोणी दिसला नाहीं कीं, या कानफांट्याच्या कपाळास तिडीक जाऊन त्यानें क्रोधयुक्त व्हावें. एका दिवशीं रात्रीं रा. विरूपाक्ष मोदीयांच्या घरीं स्वामी महाराज गेले, तेथें सर्व सामानासहवर्तमान चाकर व सेवेकरी लोकांचे लटांबरच्या लटांबर गेलें. स्वामी महाराज पलंगावर निजले असून पायगती पंख्यानें वारा घालीत हा कानफांट्या उभा होता. सभोंवताली चाकर व सेवेकरी मंडळ निजलें होतें. मध्यरात्र उलटून गेल्यावर महाराज एकाएकीं उठून बसले, तेव्हां नेहमींच्या रिवाजाप्रमाणें महाराज उठून बसल्याबरोबर त्यांच्या हातांत हुक्का भरून कोणींतरी आणून द्यावा लागत असे, तो देण्याला कोणी जागे राहिले नाहींत हें पाहून त्या कानफांट्यास अतिशय राग आला, आणि त्यासरसा त्यानें एक धोंडा उचलून हुक्का तयार करून देणारे मनुष्याच्या डोक्यांत हाणला. त्यासरसें त्याचें डोकें फुटून रक्तबंबाळ झालें, आणि सर्वच आकांत होऊन गेला. परंतु या कानफांट्याच्या अंगावर कोणाच्यानें येण्याचा धीर होईना, कारण एक तर तो महाराजांचा खरा सेवेकरी, व दुसरें तो वीस असामींस भारी असा बळकट होता. कानफांट्याच्या या अघोरी कृत्यामुळें त्याला महाराजांपासून दूर करून टाकावा, आणि असें न केल्यास प्रत्यहीं असे प्रसंग आणून कित्येक लोकांचे प्राणहि हा राक्षस घेईल, असें कांहीं प्रमुख सेवेकऱ्यांस वाटूं लागलें, तेव्हा आतां काय करावें या गोष्टीचा विचार करीत असतां त्यांना असें सुचलें कीं, परभाऱ्या या कानफांट्यावर फौजदारी खटला तयार करून तुरुंगांत पाठवून द्यावें, कारण असें न केल्यास याला शासन करणारा दुसरा कोणी नाहीं. हा विचार करून मार खाल्लेल्या मनुष्याकडून सरकारांत फिर्याद गुदरविण्याची खटपट झाली, परंतु आपसांतच चार मध्यस्थी होऊन हा महारांच्या सेवेकऱ्यांतील तंटा आहे तो सरकारांत नेणें बरोबर नाहीं, असा शिष्ट विचार कांहींनीं काढून त्या दिवशींचा बेत तर रहित केला. या कृत्यास आठ पंधरा दिवस होऊन गेले, तों पुन्हां महाराजांच्या सेवेंत कोणी तत्पर नसल्याच्या कारणानें दुसऱ्या एकास त्यानें असाच धोंड्यानें मारला. त्याला असें वाटे कीं, मी जसा महाराजांच्या सेवेंत रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून उभा रहातों त्याचप्रमाणें दुसऱ्यांनींहि रहावें. हें दुसरें प्रकरण तर लागलेंच सरकारांत गेलें, आणि त्या कानफांट्यावर जबरदस्त दुखापत केल्याचा आरोप ठेवून चौकशीअंतीं त्याला सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली. कान-

फांड्यास तुरुंगांत नेऊन सोडल्यावर सक्तमजुरीच्या कामास लावलें असतां तो काम करीत नसे, व अन्न न खाण्यास महाराजांच्या दर्शनाची सबब सांगे. आठ पंधरा दिवस झाले तरी हा कानफांड्या अन्नच खाईना, ह्मणून पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांजकडून असा हुकूम आला कीं, कानफांड्या कैदीबरोबर हत्यारबंद दोन शिपाई देऊन महाराज असतील त्या ठिकाणीं त्याला दर्शनाला नेत जावें. हा क्रम चालू असतां जंगमाच्या मळ्यांत एका दिवशीं एका थडग्यावर स्वामीमहाराज बसले होते. त्यांच्या समोर खालच्या बाजूला चार हातांवर मोगलाईतील पार्थी परभणी जिल्ह्यांतील कोणी एक देशस्थ वृद्ध ब्राह्मण महाराजांस हृदयांत धरून व नेत्र झांकून जप करीत बसला होता. महाराजांच्या शेजारीं जिला लोक महाराजांची पट्टशिष्यीण व महाराजांच्या प्रीतींतली ह्मणत ती गंगाभागीरथी सुंद्राबाई ही होती. फरास भुजंगा व दुसरे चाकर लोक व सेवेकरी मिळून सुमारें १०० लोक त्या वेळेस महाराजांबरोबर त्या दिवशीं त्या मळ्यांत जमले होते. या कानफांड्यास त्या दिवशीं महाराजांच्या दर्शनाकरितां शिपाई मळ्यांत घेऊन जात होते. जातांना त्याच्या मनांत काय विचार आला असेल तो येवो, त्यानें संधि राखून हातापायांत बेड्या असतां मळ्यांत शिरल्यावर व महाराजांपासून सुमारें २५ हातांवर असतां शिपायाची नजर चुकवून त्याच्या कमरेची तर्वार सप्पादिशी म्यानांतून बाहेर काढून हातांत घेतली, आणि पवित्रा करूं लागला. हें पाहून शिपाई मागच्या मागेंच निसटला. या समयास महाराजांची दृष्टि कानफांड्याकडे होती. आणि तो पुढें येतो असें पाहून मोठ्यानें बोलले" ह्यां क्या है? मोटके पास बैल और टोणगा है उस्केपास जाव." हे शब्द मोठ्या कडाक्याचे महाराजांच्या तोंडचे ऐकल्याबरोबर आज्ञा प्रमाण मानून कानफांड्या विहिरीकडे हातांत नागवी तर्वार चमकावित तर चालला; परंतु हे कानफांड्याचें स्वरूप पहाण्याबरोबर महाराजांच्या सांनिध असणाऱ्या लोकांची पांचावर धारण बसून त्यांनीं तर पळ काढलाच. सुंद्राबाई ही धास्तीनें कोठें दिसेनाशी होऊन गेली. रहातांपैकीं त्या शंभरांतून महाराजांपाशीं कोणीएक राहिलें नाहीं. भुजंगा फरास हा महाराजांच्या पाठीशीं उभा होता, व समोरच्या बाजूस चार हातांवर हा वृद्ध ब्राह्मण जप करीत एकाग्र मनानें बसला होता. सर्व लोकांची पळापळ होऊन ही बातमी गांवांत जाऊन पोलिसास कळतांच फौजदार बरोबर पोलीसचे

ब्रेच लोक घेऊन दवड करीत आले. मामलेदारहि त्या समयास येऊन पोंचले. इतक्या अवकाशांत हा कानफांट्या महाराजांच्या आज्ञेप्रमाणें विहिरीपर्यंत गेला आणि बैलावर किंवा ठोणग्यावर शस्त्र न धरतां तसाच महाराजांकडे परत आला, आणि त्याची व महाराजांची काय बोलाचाली झाली असेल ती असो, परंतु महाराजांच्या हुकुमावांचून त्यानें त्या ब्राह्मणावर शस्त्र उचललें नसेल, असें अखेरीस त्याच्या बोलण्यावरून व त्याच्या सेवकत्वाच्या नात्यावरून लोकांचें अनुमान आहे. महाराजांची सेवा करात्री आणि केली अशी त्या कानफांट्यानेंच. महाराजांची विष्ठा व मूत्र यांच्या सेवनानें त्या कानफांट्याचा वज्रदेह होण्याची वेळ आली होती!!! एका पुरुषास अन्नरसावांचून किंवा मांसादि आहारावांचून वीस मनुष्यांचें राक्षसी बळ येणें ही सामान्य गोष्ट आहे काय? असो: लांबून भोंताली शेकडो लोकांची गर्दी जमली होती, व पोलीसचे लोक तर कानफांट्यास पकडण्या करितां आले होते, परंतु पुढें सरसावून त्याला धरण्याची कोणास छाती होईना. महाराजांच्या समोर चार हातांवर त्या जप करणाऱ्या वृद्ध ब्राह्मणास या कानफांट्यानें आडवे उभे १६।१७ वार केले, आणि अखेरीस तर्वारीचें पातें मुठीपासून जेव्हां गळून पडलें तेव्हां त्याचे वार करणें बंद झालें. कानफांट्याचें वार करण्याचें काम जोंपर्यंत सुरू होतें, तों पर्यंत त्या वृद्ध भक्तावर एक सारखी महाराजांनीं नजर ठेवली होती, इतकेंच काय तें लोकांच्या दृष्टीस महाराजांनीं केलेलें पडलें, परंतु त्या जप करणाऱ्या ब्राह्मणाचें एकाग्र लक्ष होऊन गेलें असल्यानें कानफांट्याचा काय दंगा चालू होता ह त्यास कळलेंच नव्हतें, त्यामुळें तर्वारीचा पहिला वार मानेवर होईपर्यंत त्याचें ध्यान मोडलें नव्हतें, परंतु आपल्याला कोणी तरी शस्त्रघाय करीत आहे असें जेव्हां त्याला वाटलें, तेव्हां मात्र व्याघ्रतडाक्यांत गाय सांपडली असतां जशी कांहीं एक हालचाल करीत नाहीं त्याप्रमाणें महाराजांवर विश्वास ठेवून व दोन तीन घाव अंगावर सोशींपर्यंत महाराजांकडे दृष्टि लावून बसला होता. नंतर अस्ताव्यस्त होऊन डोळे पांढरे करून जमिनीवर पडला. तर्वारीचें पातें मुठींतून गळून पडल्यावर नाइलाज होऊन तो कानफांट्या इकडे तिकडे पहात फिरत होता, परंतु फौजदार, मामलेदार, जमादार, नाईक, हावलदार व दुसरे मोठमोठाले अम्मलदार जमले होते, तथापि १०–९ असामी मिळूनहि त्याच्या अंगावर चाल करून जाण्याची कोणाची हिंम्मत होईना. त्याच्या

हातीं लागल्यास नुस्ता मुष्टिप्रहारानें तो चुराडा करून टाकील अशी तेथें जमलेल्या लोकांपैकीं प्रत्येकास भीति वाटत होती. इतक्यांत त्या वाटेनें एक भला धिप्पाड धनगर महाराजांच्या दर्शनास येत होता, तो या कानफाट्याच्या चौपट बलवान आहे असें त्याच्या शरिराच्या पिंडावरून दिसत होतें, ह्मणून त्याला त्या कानफाट्यास धरण्याची नेत्रसांकेतिक खुण कोणीं केल्यावरून त्यानें त्याच्या अंगास मागच्या बाजूनें वेळखा घालून पकडलें. मग मात्र पोलिसचे लोक भरारा त्याच्या पाठीमागें जमले. आणि त्याला आवळून बांधून घेऊन गेले!!! त्याला बांधतेवेळीं मात्र तो असें शब्द बोलला कीं, "मारनेवाले तो बहूत है, और तारनेवाला तो येच येक है, औरे सब दुनियामे मुर्दे है." पुढें या कानफाट्यावर तर्वारीनें वार केल्याबद्दल मोठा खटला होऊन पौलिटिकल सुपरिंटेंडेंटनीं त्याला ६।७ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. कैदेंत असतां पहारेकऱ्यांस त्यानें फारच भंडावून सोडलें होतें. महाराजांच्या दर्शनाखेरीज तो अन्न घेत नसे, दांडगाई फार करी, सबब त्याला साखळदंडानें जसा वाघाला बांधून ठेवतात त्या प्रमाणें लोखंडाचे चौफेर डांम पुरून त्याच्या कमरेला साखळदंड बांधून त्याला बांधून ठेवला होता, आणि प्रत्यहीं त्याच्या हट्टाबद्दल त्याला फटके मारीत असत, तथापि तो चैनीनें आपली पाठ सैल देऊन माशा मारल्यासारखेच फटके अंगावर घेई!!! अशा प्रतिबंधांत जेव्हां त्याला ठेवला आणि बाहेर काढीनासे झाले, तेव्हां पासून आठपंधरादिवशीं तुरुंगांत जाऊन महाराज त्यास दर्शन देत असत. पुढें अक्कलकोटच्या तुरुंगांतून त्याला दुसऱ्या तुरुंगांत पाठविला व अद्यापि त्याच्या शिक्षेचीं त्याला कांहीं वर्षें भरावयाचीं आहेत. जखमा झालेल्या मनुष्यास अक्कलकोट येथील डाक्तरानें इस्पितलांत नेलें, व तेथील उपचारानें तो आठचार दिवसांत बरा होऊन महाराजांच्या प्रसादानें आपला इच्छित कार्यभाग करून घेऊन परत आपल्या गावीं जाऊन महाराजांचें चिंतन व पादुकांची नेहमीं पूजा करीत बसला व अद्यापि तो जिवंतहि आहे.

चाकूचे किंवा सुरीचे सामान्य वार मानेवर किंवा पाठीवर अगर पोटावर झाले असतां तो मनुष्य सहसा वांचल्याचें आपल्या फारच थोड्या प्रसंगीं कानीं आलें आहे, तथापि वर सांगितलेल्या मनुष्यास भल्या धटिंगण पुरुषाच्या हातानें, व ते चाकूचे किंवा सुरीचे नसून, तर्वारीचे १६।१७ जबर-

दस्त मोठाले व जोराचे वार झाले असतां तो मनुष्य अल्पस्वल्प औषधोपचारानें मरत नाहीं, आणि ज्याच्यासमोर आपल्याला वार झाले व ज्यानें आपल्याला वार होऊ नयेत ह्मणून कांहींच दिसणारी खटपट केली नाहीं, असें प्रत्यक्ष पाहिले असतां तो फिरून महाराजांच्या सेवेंत विकल्परहित तत्पर रहातो, त्या अर्थी दृक्पाताच्या योगेंकरून स्वामीसमर्थांनींच त्याचें त्या कानफांट्या यमाच्या हातून रक्षण केलें अशी त्याची पक्की खातरी झाल्याचें त्याच्या पुढच्या स्थितीवरून अनुमान होतें. आणि अशाच किंवा दुसऱ्या प्रकारऱ्या जनास अदृश्य व ज्याच्या त्यास मात्र दृश असल्यानें असल्या अद्भुत गोष्टींची कोणी परिस्फुटता करीत नाहींत. असें जें अनुमान आहे तें पुष्कळ अंशीं खरें असावें असें वाटतें. एका चांगल्या व राजविद्याभुषित असलेल्या विद्वान, निस्पृह व श्रीमान गृहस्थास, त्यालाच दृश्य अशा प्रकारच्या महाराजांनीं दाखविलेल्या अद्भुत चमत्कारानें त्याच्या सर्व संशयांचें छेदन झाल्याविषयीं एका विश्वसनीय गृहस्थाकडून आह्मास बातमी कळल्यावरून त्या गोष्टींच्या खरेपणाविषयीं आह्मी त्यांस पत्रद्वारें विचारिलें; तेंव्हां त्यांनीं आह्मांस चार शद्बांत जो मतलब कळविला तो वरील अनुमानास अधिक बळकटी आणून देणारा असल्यानें त्यांच्या मूळ शद्बांतच पुढें दिला आहे:— " *** Though I had the greastest veneration and respect for Swami–Maharaj of Akalkote, I desire that nothing about me should appear in the book you are bringing out. There was an exchange of minds which was intended to be secret, and it is not proper or desirable to violate the secrecy ***:—"अशा मासल्याचे ज्याचे त्यास दृश्य असणारे अद्भुत चमत्कार हे व्यक्तीपुरतेच असतील, किंवा दुसऱ्यास प्रकट करण्यासारखे नसतील, ह्मणून त्यांची परिस्फुटता होत नसेल, हें एक कारण असेल, व दुसरें असें वाटतें कीं, एकंदरीनें लोकांच्या बहुसमाजाचा कल विशेषेंकरून असत्याकडे असल्यानें वर सांगितल्याप्रमाणें एकऱ्याच्याच दृष्टीनें दिसणारा चमत्कार, तो त्यानें दुसऱ्याजवळ भाविकपणानें सांगितला, तर तो कुटिल व अनेक तर्कवादी लोकांच्या फाजिल शहाणपणापुढें विनाकारण थट्टेस पात्र होतो, इतकेंच नाहीं, परंतु त्यांच्या त्या अज्ञानपणामुळें अशा थोर पुरुषांचा उपमर्द होतो, या कारणास्तव असले हे प्रकार गुप्त ठेवण्याची फारच शहाणपणाची चाल सुज्ञांनीं करून ठेविली

आहे. वास्तविक खरें जें तें गुप्त कां ठेवावें, अशी कित्येकांची शंका निघणारच, परंतु विचारांतीं तिचें इतकेंच उत्तर सुचतें कीं, आपल्या प्रिय राजाबरोबर परशत्रूचा युद्धसंग्रामादिक प्रसंग सुरू झाला असतां कित्येक अत्यंत महत्वाच्या ज्या बातम्या असतात त्या आपल्याला आपले प्रिय राजे वेळच्यावेळीं कळवीत नाहींत, याचें जें कारण आहे, तेंच या शंकेचें छेदक उत्तर आहे. असे अद्भुत चमत्कार पुष्कळ लोकांच्या अवलोकनांत व प्रत्ययास आले आहेत, परंतु ते सर्व वर दर्शित केलेल्या कारणांनीं जागजागीं गुप्त होऊन राहिले आहेत.

वर दिलेल्या हकीकतीवरून महाराजांनीं दृक्पाताच्या योगें आपल्या भक्तांचें संरक्षण केलें आहे, त्याचप्रमाणें पुढें दिलेल्या हकीकतीवरून महाराजांनीं दुसऱ्या एका भक्तास वैकुंठपुर दाखवून आपल्या सामर्थ्याच्या योगें त्याच्या दुःखाचें निवारण केलें व सांकेतिक रीतीनें कानडी भाषेत विलक्षण प्रकारानें उपदेश केला असें दिसून येईल. रा. नरसाप्पा या नांवाचा कोणी एक ६० वर्षांच्या वयाचा म्हैसूर प्रांतांतील मनुष्य अक्कलकोट येथें स्वामीमहाराजांपासून उपदेश घेण्याच्या हेतूनें येऊन राहिला होता. त्याला मराठी किंवा हिंदुस्थानी भाषा १०।१५ शब्दां पेक्षां अधिक बोलतां येत नसे, त्यामुळें त्याच्या हेतूप्रमाणें त्याला काय पाहिजे हें त्याला महाराजांस कळवितां कसें येईल या विवंचनेंत तो होता. परंतु नित्य नेमानें महाराजांचें दर्शन घेऊन त्यांच्या संनिध उगीच जाऊन बसण्याचा त्यानें नेम धरला होता. एके दिवशीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, महाराजांच्या पुढें पुराण चाललें होतें, आणि त्या पुराणिकाशेजारीं नरसाप्पा बसले होते. पुराण आटपण्याच्या सुमारास नेत्रसंकेतानें महाराजांनीं नरसाप्पास आपल्यापाशीं बोलाविलें. तेव्हां नरसाप्पास अत्यानंद झाला, आणि महाराजांकडे जाऊन त्यांच्या चरणावर त्यानें मस्तक ठेविलें, आणि साष्टांग नमस्कार घालून शेजारीं बसला. इतक्यांत महाराजांनीं शेजारीं जमाखर्च मांडणारा एक कारकून बसला होता, त्याजपासची एक वही हातांत घेतली, आणि तिचीं पानें चाळून ती नरसाप्पाच्या हातांत दिली. नरसाप्पानें त्या वहीचें वरचेंच पृष्ठ पहाण्याबरोबर त्याला भगवद्गीता म्हण म्हणजे तुझें कार्य होईल अशीं उपदेशपर कानडी लिपींत अक्षरें त्याच्या दृष्टीस पडलीं. मग त्याच्या आनंदास कांय विचारतां? त्याला महाराजांकडे आल्याचें सार्थक वाटून हा मजकूर त्यानें वे. शा. सं दत्तात्रय बाबा पुरा-

णिक यांस वाटेंत सांगितला, आणि भगवद्गीता समजाऊन देण्यावि-षयीं त्यानें त्यांची विनंती केली. दत्तात्रय बावा हे ह्या प्रसंगीं महाराजां-संनिधच होते, त्या कारणानें हा मजकूर त्यांनीं ऐकल्याबरोबर त्यांस अ-त्यंत आश्चर्य वाटलें, ह्मणून ते नरसाप्पास बिऱ्हाडीं सोडून त्याच पावलीं मागें परतले, आणि नरसाप्पाच्या हातांत महाराजांनीं जी वही दिली होती, ती त्या कारकुनाजवळून मागून घेऊन सर्व पाहिली. परंतु तिजवर एकहि कानडी अक्षर त्यांच्या दृष्टीस पडलें नाहीं, ह्मणून त्यांनीं दुसऱ्या सर्व वह्या चाळून पाहिल्या. तथापि एकाहि वहींत एकाहि पानावर शुद्ध मोडी अक्ष-रावांचून एकहि दुसऱ्या कोणत्याच भाषेचें अक्षर दृष्टीस पडलें नाहीं. तेव्हां महाराज खरोखर सर्वसमर्थ आहेत आणि ते व्हावी ती अद्भुत लीला करतील अशाविषयीं त्यांचीं दृढ भावना होऊन ते परत आपल्या बिऱ्हाडीं गेले. त्या दिवशींच त्यांनीं नरसाप्पास भगवद्गीता सांगण्यास आरंभ केला. पुढें एका दिवशीं रात्रीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, दत्तात्रय बावा, एक स्वामी व तिसरा नरसाप्पा हे बोलत बसले असतां नरसाप्पास झोप लागली. स्वामी व पुराणिक हे वेदांतगोष्टी बोलत बसले आहेत; इतक्यांत म-ध्यरात्रीच्या सुमारास नरसाप्पा एकाएकीं घामाघुम होऊन व अंगावर रो-मांच उभारलेले व भयभीत होत्साता उठून बसला, आणि स्वामी महाराज थोर व खरोखर ईश्वर आहेत असें आपल्याशींच बोलूं लागला. हें ऐकून स्वामींनीं नरसाप्पास विचारिलें, कीं महाराज ईश्वर आहेत, असें तू कशाव-रून ह्मणतोस. त्याजवर नरसाप्पानें उत्तर दिलें. अहो महाराजांनीं मला वैकुंठास नेऊन सुवर्ण मंदिरांत जडावाच्या सिंहासनावर छत्रचामरादिसह रा-म वामांकी सीतेस घेऊन लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न व मारुती हे जवळ उभे आहेत त्या श्रीरामजीचें दर्शन करवून आतांच मला त्यांनीं परत आणिलें. इतकें उत्तर देऊन आपल्याशींच वाहवा वाहवा! महाराज! आज या दीनावर मोठीच कृपा केलीत, असें बोलून महाराजांची फारच स्तुति करूं लागला. त्या दिवसापासून नरसाप्पाची महाराजांवर अतिशयच भक्ति बसली. अ-सो, पुढें आठचार दिवसांनीं असा कांहीं चमत्कार झाला कीं, नरसाप्पाच्या उजव्या हातास एकाएकीं कळ लागून त्यानें त्यास बेजार करून सोडलें. एका दिवशीं महाराजांचें दर्शन घेऊन नरसाप्पा ह्मणाला, महाराज, ह्या हातास कळ लागून आज सात दिवस झाले, त्यामुळें फार त्रास होतो, या-ला कांहीं तरी औषध सांगा. महाराज हुक्का ओढीत बसले होते, ते नर-

साप्पास ह्मणाले, “ हां ठीक आहे; आह्मी आतां तुझा हात बरा करतों.” इतकें बोलून नरसाप्पाच्या हातावर महाराजांनीं तोंडांतील हुक्कयाचा धुर सोडला आणि त्यासरशी नरसाप्पाच्या हाताची सात दिवसांची कळ एका क्षणांत नाहींशी झाली ! काय विलक्षण दैविक शक्ति ही !!!

उपासनामार्गानें चालणाऱ्या एका गृहस्थाश्रमी असणाऱ्यास वर सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं रामदर्शन स्वप्नांत देऊन विरक्तता प्राप्त झालेल्या आपल्या भक्तास संसारमार्गांत परत पाठवून दिल्याची गोष्ट आमच्या कानीं आली आहे. रा० सिताराम हरि नेने, हे पुण्यापासून पांच सहा कोसांवर गराडें या नांवाचें एक गांव आहे, तेथील रहाणारे असून रामोपासना करण्यांत नौकरीचें काम संभाळून बाकीचा वेळ घालवीत असत; आणि रामदर्शन व्हावें अशी त्यांची पराकाष्टेची उत्कंठता झाल्यानें नौकरीचा व घरच्या माणसांचा त्याग करून त्यांनीं अक्कलकोटची वाट धरली, आणि तेथें माधुकरी फक्त देहरक्षणापुरती मागून महाराजांच्या सेवेंत काळ घालवावा असा इरादा केला होता. अशा हेतूनें अक्कलकोटास नेने जाऊन पोंचल्यावर त्यांना ओळखणारा त्यांचा एक स्नेही नेने हे महाराजांच्या दर्शनास गेले असतां तेथें अवचित त्यांस भेटला. तेथें जाण्याचा उद्देश वगैरे नेने यांस विचारपुस केल्यावरून माधुकरीस जाण्याचा त्यानें नेने यांचा बेत रहित करविला. भावांतरज्ञाते स्वामीमहाराज असल्यानें नेने यांची कडक निष्ठा पाहिल्याबरोबर सातवे दिवशीं त्यांस दिवसा स्वप्नांत रामदर्शन देऊन सर्व शंकाचा छेद करून परत गांवीं पाठवून दिले.

एका काशीकर स्वामींस प्रवासांत महाराजांनीं दृष्टांत देऊन अक्कलकोट येथें आणिलें आणि त्यांस योगाभ्याससंबंधानें उपदेश केला, ती कथा अशी आहे कीं, हे स्वामी पूर्वाश्रमी असतां काशींतील रहाणारे होते; परंतु बंगाल इलाख्यांतिल नदियाशांतिपुर येथें त्यांनीं मिमांसा, न्यायशास्त्र, वेदांत, मंत्रशास्त्र इत्यादि शास्त्रांचें यथार्थ अध्ययन केलें. यांची बुद्धि विलक्षण तीव्र व स्वभावानें ते फारच निस्पृह असून यांच्या अंगीं चार पांच भाषांचें ज्ञान असून मूर्ती वामनाप्रमाणें व पिंड सहजी तालिमबाजाप्रमाणें व सतेज दिसत असे. कलकत्त्याच्या पलीकडे उडियाजगन्नाथ ह्मणून एक पवित्र क्षेत्र आहे, त्या ठिकाणीं यांनीं संन्यास घेतला; संन्यास घेतल्यावर ते रामेश्वराच्या यात्रेस गेले. परत येतांना बारा मलेवारांत उत्कल देशांत श्रीस्वामी महाराजांनीं या स्वामींस कांहीं दृष्टांत दिला. काशीकर स्वामीं-

स हा दृष्टांत उत्कल देशांत ज्या दिवशीं झाला त्या दिवसापासून सात दिवसपर्यंत विसावा व अन्नपाणी न घेतां रात्रंदिवस मजल मारून शके १७९९ पौष्य वद्य ११ रोजीं सकाळीं उपोषित ते अक्कलकोटास येऊन दाखल झाले. त्या वेळेस स्वामीमहाराज शेकनुरदीन याच्या दर्ग्यांत बसले होते. तेथें जाऊन त्यांनीं स्वामीमहाराजांचें दर्शन घेतलें; आणि एक महिना त्या पवित्र स्थलांत महाराजांसंनिध वास करून कार्यभाग होण्याबरोबर चालते झाले.

हे स्वामी कोठून व कशाकरितां आले याची बातमीच अक्कलकोटांत कोणाला कळली नव्हती, परंतु रात्रीं यांची वस्ती वे.शा.सं. दत्तात्रय बावा पुराणिक यांच्या घरीं असल्यानें व पुराणिक बावा हे विद्वान व महाराजांचे खरोखर सेवक दिसल्यानें त्यांजपाशीं मात्र या स्वामींनीं हा चमत्कार सांगितला. या गोष्टीवरून असें एक अनुमान होतें कीं, हे काशीकर स्वामी आपल्या तपोबलानें शास्त्ररीत्या ज्या पायरीस जाऊन पोंचले होते तिच्या पलिकडे जाण्यास त्यांना मार्ग दाखविणारा या भूमंडळावर कोणी नसल्यानें त्यांना आपल्यापाशीं आणून महाराजांस स्वतः उपदेश करावा लागला. किती तरी हें महाराजांचें कृपालुत्व!!! भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां समर्थांनीं निरंतर भूमंडळावर वास केला!!! आणि कारणपरत्वें दूरदूरच्या ठिकाणींहि अक्कलकोटास असतां अक्कलकोटच्याच रूपानें स्थूल देह धरून आपल्या हातानें आपल्या भक्तांस व्यवहारदृष्टीनें औषधें पाजलीं, व कित्येकांस दर्शनें देऊन त्यांच्या अंतःकरणांतील संशयरूपी मल धुवून टाकिला !!!

वे. शा. सं. रा. रा. दत्तात्रय बावा साधले पुराणिक यांची गोष्ट अशी आहे कीं, हे पुराणिक बावा योगाभ्यास व वेदांतज्ञान प्राप्त करून घेण्याच्या हेतूनें बदरीवनांत एका विद्वान व योग करणाऱ्या स्वामीचे शिष्य होऊन राहिले असतां त्या स्वामींनीं योग पुरा करून काशीवासास जाण्याचा बेत केला. त्या वेळीं पुराणिक बावांस स्वसंतोषानें स्वामींनीं आपली सेवा बंदकरण्यास सांगून घरीं जाऊन संसार करण्यास आज्ञा केली. परंतु पुराणिक बावांची स्वामींवर अतिशय भक्ति बसली असल्यानें त्यांना स्वामींची सेवा सोडून स्वकार्यलाभ दवडावा असें वाटेना, ह्मणून पुराणिकबावांनीं स्वामींबरोबर काशीस जाण्याबद्दल होती तितकी पराकाष्ठा केली, अखेरीस स्वामींनीं आज्ञाभंग केल्यास शापीन असें पुराणिकबावांस निक्षून सां-

गितल्यावरून ते घराकडे जाण्यास निघाले, व स्वामी काशीस चालते झाले. पुराणिकबावांस स्वामींचा सहवास तुटल्यानें अतिशय दुःख झालें; त्यामुळें त्यांना घराकडे जाण्याचें सुचेना. ह्मणून सहा महिने पर्यंत तीर्थयात्रा वगैरे करून पुन्हा स्वामींच्या समागमास काशींत जाण्याचा निश्चय पुराणिक बावानीं केला. यात्रा वगैरे सहा महिने करून पुराणिकबावा स्वामीआज्ञेप्रमाणें घरीं न जातां काशीस गेले, आणि पहिल्यानें त्यांनीं स्वामींची भेट घेतली. स्वामी पुराणिक बावांस पहाण्याबरोबर तर लाल होऊन गेले, परंतु पुराणिकबावांची विषेश भक्ति दिसल्यावरून त्यांचा क्रोध जरा शांत झाला. पुढें दोन चार दिवसांनीं स्वामींनीं पुराणिकबावांची जेवणाखाणाची वगैरे सोय लावून देऊन शास्त्राभ्यास करण्याकरितां त्यांला आपल्या जवळ ठेवून घेतलें. हा क्रम चालू असतां एका दिवशीं या पुराणिकबावांस महामारीचा जबरदस्त उपद्रव होऊन त्यांच्या पंचप्राणांचें आकर्षण होत चाललें. औषधोपचार चालेना, व कांहींवेळ त्यांचें प्राणोत्क्रमणहि झालें, असें त्यांच्या गुरुस्वामींस व दुसऱ्या मंडळीस वाटलें. परंतु त्या ठिकाणीं महाराजांनीं काय अद्भुत चमत्कार केला? जवळच्या लोकांस तर वाटलें कीं, पुराणिकबावांचा अवतार संपला, आणि पुराणिकबावा तर बेशुद्ध होऊन दोन तास अगोदरच डोळे पांढरे करून पडले होते. पुराणिकबावांची नाडी वगैरे पाहून कांहीं लोक आतां पुढच्या त टपटीस लागणार इतक्यांत पुराणिकबावांसच मात्र किंचित सावध झाल्यासारिखें अंतर्यामीं वाटून कोणी एका संन्याशानें आपल्यास औषध पाजिलें आणि त्यापासून आतां आपल्याला चांगला गुण आला असें त्यांनीं त्यांस सांगितलें, असा भास मात्र झाला, आणि डोळे उघडून पहातात तों संन्याशी ज्या स्वरूपाचा पाहिला त्या स्वरूपाचा दिसत नसून सावध असतां जी मंडळी जवळ बसलेली होती त्यांजपैकीं एकहि जवळ नसून दूर बऱ्याच अंतरावर खिन्न वदनानें बसलेली दिसत होती. उठावयास पहातात, तों आवसान नाहीं, कोणास हाक मारावी तर तोंडांतून शब्द निघेना; इतक्यांत कोणी एकानें पुराणिकबावांचें अंग हाललेलें पाहिलें. त्यावरून तो त्यांच्या शेजारीं गेला, आणि पहातो तों पुराणिकबावांनीं डोळे उघडले आहेत असें त्यास दिसलें त्यावरून त्याला थोडासा आनंद झाला. इतक्यांत दुसरे दोन चार असामी पुराणिकबावाशेजारीं आले, आणि पुराणिकबावांच्या संकेताप्रमाणें त्यांनीं त्यांस उठवून बसविलें. गुरुस्वामी हे

जवळ होतेच; त्यांनाहि फार आनंद झाला, आणि आपल्या शिष्यानें यमाजीची चिठी परतवली असें त्यांस वाटलें. नंतर कांहीं वेळानें पुराणिकबावा चांगले सावध झाले व एकांतीं आपल्या गुरूजींस मला काय औषध पाजलेंत ह्मणून विचारलें. गुरूजींनीं ही गोष्ट अजी नाकबूल करून सांगितलें कीं, माझ्या शिवाय दुसरे दोन चार संन्याशी तुझ्या समाचाराला आले होते, परंतु तुला औषध देणारा एकहि आला नव्हता. हा कांहीं तरी ईश्वरी चमत्कार झाला असेल. इतकें सांगून त्यांनीं ही गोष्ट गुप्त ठेवण्याविषयीं सांगितलें.

त्याच दिवशीं पुराणिकबावाचा हा आजार नाहींसा झाला. व पुढें दोनतीन दिवसांनीं पूर्ववत् हुषार होऊन आपल्या अभ्यासास त्यांनीं पुन्हा सुरूवात केली, परंतु कोणत्या अवधूत पुरूषानें येऊन कोणास नकळत आपल्याला औषध पाजिलें त्याचा शोध करून त्याचें दर्शन केव्हां होईल ही त्यांस अतर्यामीं चिंता लागून राहिली. कांहीं दिवस लोटल्यावर गुरूस्वामींनीं पुराणिकबावांस घरीं जाण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें पुराणिकबावा घरीं येण्यास निघाले, आणि वाटेनें येतां येतां साधुसंत रहाण्याचें जें जें स्थल दृष्टीस पडेल, त्या त्या स्थलीं दोन दोन चार चार दिवस राहून, सर्वांचीं दर्शनें घेऊन त्यांत आपला अवधूत पुरूष दृष्टीस पडल्यास त्याच्या सेवेस रहावें असा त्यांनीं मनांत संकल्प केला. काशीकडून दक्षिणदिशेकडे आले आणि वाटेनें शेकडों संत त्यांनीं पाहिले, परंतु आपल्याला औषध दिलेला हा असावा अशाविषयीं एकाबद्दलहि त्यांची कल्पना होईना. अखेर अक्कलकोटची कीर्ति ऐकल्यावरून तेथें जाण्याच्या इराद्यानें वाटेनें जात असतां त्यांचा एक मुक्काम बार्शीस झाला. तेथें त्या दिवशीं त्यांचें पुराण झालें. पुराण सांगण्याची त्यांची शैली चांगली असल्यानें तेथील लोकांस तें फार प्रियकर वाटलें. आणि तेणेंकरून पुराणिकबावांस बार्शीस ठेवून घेण्याचा त्यांनीं बेत केला. पुराणिकबावांनीं गेलीं १२ वर्षें जो प्रवास केला तो फक्त दोन पंचे, दोन धोतरें व सोवळें आणि भांडें इतक्यानिशींच केला होता, व त्यांची कोणत्याहि प्रकारची इच्छा नसल्यानें, आणि १२ वर्षें जिवापलीकडे कष्ट भोगून जें कांहीं गुरूकृपा होण्याचें साधन करून घेतलें होतें, तें त्यांच्या घरच्या प्रापंचिक माणसांस आवडतें होण्यासारिखें नसल्यानें, आणि द्रव्यविरहित फारा दिवसांनीं त्यांना भेटावयाला गुरूआज्ञेप्रमाणें जाणें जितकें लांबणीवर जाईल तितकें

बरें अशा कल्पनेनें, त्यांनीं बार्शीच्या लोकांच्या ह्मणण्यास रुकार देऊन कांहीं दिवस तेथें राहण्याचा बेत केला. ईश्वर करणीचे योग कसे घडून येतात ते पूर्वी कोणाला कळून येत नाहींत. कांहीं दिवस लोटल्यावर पुराणिकबावांची हकीकत तेथील लोकांना कळली, आणि गुणांवरून त्यांच्यावर लोकांची इतकी कांहीं भक्ति बसली कीं, पुराणिकबावांना त्यांच्या गांवीं न जाऊं देतां त्यांचीं माणसें बार्शीस आणवून त्यांना गांवकरी करण्याचा बेत केला, आणि त्याप्रमाणें घोडे व गडी पाठवून पुराणिकबावांचें कुटुंब व बंधु या दोघांस पहिल्यानें आणविलें. पुराणिकबावांनीं विचार केला कीं, मंडळीचा आग्रहच आहे तर "पोट भरेल तोच आपला गांव कां ह्मटलें नाहीं ?" लग्न झाल्यापासून १२ वर्षांत नवराबायकोची भेट झाली ती बार्शीस. असो, पुढें थोड्याच दिवसांनीं पुराणिकबावा श्री स्वामीसमर्थांच्या दर्शनास अक्कलकोटास गेले. तेथें महाराजांचें दर्शन होण्याबरोबर महाराजांस सोडून परत बार्शीस जावें असें पुराणिकबावांस वाटेना. महाराजांची मुद्रा पाहून आपणास काशीक्षेत्रीं जीवदान देणारे हे समर्थ असावेत असें त्यांस खात्रीपूर्वक वाटलें, परंतु महाराजांच्या वर्तनाच्या योगें बरेच दिवस राहिले असतांहि महाराजांकडून कांहीं खुण पटेना. तथापि पुराणिकबावांस असें वाटलें कीं, ही स्वारी फारच गुप्त आहे, आणि हे कोणत्याहि प्रकारें सध्यां कांहींच खुण पटूं देत नाहींत, तरी यांचा पिच्छा सोडतां उपयोग नाहीं, आपला कार्यभाग जो होणें आहे तो झाला तर होण्याचें हेंच एक स्थळ दिसतें, असा विचार करून पहिल्या खेपेस तर ते लवकरच बार्शीस परत गेले. तेव्हांपासून प्रपंचकार्यार्थ महिना पंधरा दिवस बार्शीस व महिना पंधरा दिवस स्वकार्यसाधनार्थ अक्कलकोटास रहाण्याचा त्यांनीं दोन वर्षेपर्यंत क्रम ठेवला होता. हा क्रम चालू असतां एका खेपेस पुराणिकबावा महाराजांच्या दर्शनास गेले असतां, महाराज पुराणिकबावांस "तूं गाई बाळगतोस?" असें बोलले, त्याजवर पुराणिकबावांनीं "हो" ह्मणून तर ताबडतोब उत्तर दिलें. परंतु या बोलण्याचा अर्थ पुराणिकबावांनीं असा घेतला कीं, आपण गायत्रीची सेवा करावी अशी महाराजांची आपल्याला आज्ञा असेल, आणि ही खरी असेल, तर त्यांच्या इच्छेनुरूप आपल्याला पूजेस योग्य अशी गायहि मिळेल. त्या खेपेस बार्शीस गेल्यावर ही कल्पना अक्षरशः खरी झाली. पुराणिकबावा बार्शीस गेल्यावर दुसरे का तिसरे दिवशीं त्यांना एक गाय एका गृहस्थानें आणून दिली.

ही गाय शुभ्रवर्ण असून शुद्ध कामधेनुच जशी कांहीं होती. ठेंगणी असून पुट्टा भरदार, शिंगें वळलेलीं कमानी आकृतिसारिखीं, आणि पुच्छ गोंडस असून दर्शनीं मनोहर व ह्मटलें त्यावेळेस दुध देणारी अशी होती. ही गाय खटपट केल्यावांचून आपल्या घरीं चालून आली, त्याअर्थीं महाराजांच्या बोलाचा आपण जो अर्थ घेतला त्याचा अनुभव आपल्यास तात्वडतोब आला, आतां आपण " हो " ह्मणून ज्या अर्थानें ह्मटलें आहे, तें खरेपणाला नेण्याचें आपलें काम राहिलें आहे. ही कामधेनु पुराणिकबावांच्या घरीं आल्यावर प्रापंचिक विचारानें महाराजांचें कृपालुत्व किती त्यांना वाटलें असेल याचा विचार वाचकांनींच करावा. बंधूची लहान लहान दोन तीन मुलें घरांत, बंधु व उभयतांची दोन कुटुंबें, आणि आल्या गेल्याचा रगाडा इतक्यांना दुधाची व कालवणाची चमन उडेपर्यंत त्या एका गाईनें पाहिजेल त्यावेळीं दुध द्यावें ! ! ! ज्या पुराणिकबावांनीं प्रपंचकार्यार्थ लोकाश्रय मिळविण्याची खटपट करण्याचें सोडून सतत १०२ वर्षे संतसमागम केला, तो लोकहल्ला मार्ग दिला, तथापि खरा न्याय कर्त्याचे दप्तरांत सत्कारणीं लागल्यानें प्रपंचाची काळजी त्यांस कशास पाहिजे होती ? गाय घरीं आल्यादिवसापासून पुराणिकबावांनीं तिची सेवा करण्याचें काम यथासांग चालविलें. कांहीं दिवस लोटल्यावर पुराणिकबावांना ही गाय व आपलें सर्व कुटुंब घेऊन अक्कलकोटासच स्वामीमहाराजांच्या सेवेस राहून ही गाय त्यांना द्यावी असें आल्यावरून ते अक्कलकोटास वस्ती करण्याकरितां गेले. अक्कलकोटास गेल्यावर महाराजांना गाय द्यावयाची ह्मणजे याचा भावार्थ त्यांच्या मनांत असा होता कीं पूजनार्थ गाय आपल्या घरीं ठेवून त्या गाईचें सर्व दुध महाराजांना नेऊन द्यावयाचें. असा क्रम अक्कलकोटास कांहीं दिवस चालू असतां त्या गाईच्या शेजारीं बांधण्याकरितां आणखी एक दोन गृहस्थांनीं चार पांच दुसऱ्या गाई पुराणिकबावांस आणून दिल्या. या वेळेस पुराणिकबावांजवळ एकाद्या श्रीमान गृहस्थाप्रमाणें एक शुभ्रवर्ण कामधेनु, तिच्या जोडीला दुसऱ्या ५।६ गाई, त्यांचीं वासरें आणि एक घोडा अशीं जनावरें जमलीं. जनावरांचें एवढें लटांबर, घरची ८।१० माणसें आणि प्रत्यहीं दोनचार अतिथिअभ्यागत इतक्यांचा निर्वाह करण्यापुरतें पुराणिकबावांजवळ तर कांहीं साधन नव्हतें, परंतु साधनच कांहीं ह्मटलें तर काय ती महाराजांची अनन्यभावें सेवा हें होतें. कोणाजवळ कांहीं मागितल्यावांचून, व महाराजांनीं

प्रत्यक्ष कांहीं आपल्या हातानें उचलून दिल्यावांचून कसा ते चालवीत असतील तें त्यांचे त्यांनाच माहीत. घरचा जेवणाखाणाचा थाट तर सरदारी असे. असो, एका दिवशीं महाराजांनीं अशी नक्कल केली कीं, पुराणिकबावा महाराजांच्या दर्शनास गेले असतां त्यांच्या संनिध सुंद्राबाई ही होती, आणि तिच्या देखत महाराजांनीं पुराणिकबावांस अनुलक्षून मोघम असें विचारलें कीं, " आमच्याकरितां गाय आणि घोडें आणिलें तें अजून पर्यंत आपल्याच घरीं ठेविलें. " हे शब्द ऐकून महाराजांच्या अंतरसाक्षपणाविषयीं पुराणिकबावांची अधिकाधिक बालंबाल खातरी होत चालली आणि लागलेच त्यांनीं उत्तर दिलें, " महाराज गाय आणि घोडें हीं आपलींच आहेत. मी त्यांचें रक्षण मात्र करितों. व्हावीं तेव्हां आपल्या जवळच आहेत." हें उत्तर ऐकल्यावर महाराज तर स्तब्ध बसले, आणि तो विषय अजीबात सोडून देऊन निराळेंच कांहीं बोलूं लागले. ह्या गोष्टीस आठ चार दिवस होऊन गेले. तितक्या अवकाशांत गाय आणि घोडें हीं महाराजांचीं महाराजांस आणून देण्याविषयीं चार पांचदा सुंद्राबाईनें महाराजांच्या अपरोक्ष पुराणिकबावांजवळ गोष्ट काढली; परंतु तिचें बोलणें त्यांनीं फारसें मनावर घेतलें नाहीं. नुस्तें, हो, हो, ह्मणून मात्र सांगत. अखेरीस एका दिवशीं सुंद्राबाई महाराजांचे दोनचार सेवेकरी बरोबर घेऊन पुराणिकबावांच्या घरीं गेली, आणि गाय आणि घोडें सोडून घेऊन चोळाप्पाचे घरीं घेऊन आली. गाय आणि घोडें हीं जिकडच्या तिकडे गेलीं, याजबद्दल पुराणिकबावांस समाधान वाटलें. परंतु गाईच्या सेवेंत किंचित् अंतर पडेल अशी थोडीशी त्यांना धास्ती वाटली. तथापि समर्थांची इच्छा असें मनांत आणून उगेच राहिले. ही गाय अजूनपर्यंत चोळाप्पाच्या घरीं आहे.

पुराणिकबावा अक्कलकोटास वस्तीला गेल्यावर तीन वर्षांनीं एका दिवशीं महाराजांनीं त्यांना काशींत औषध दिल्याची ओळख दिली. तेव्हां तर पुराणिकबावांची महाराजांविषयीं पूर्ण खातरी झाली. प्रत्यहीं कांहीं तरी नव्या चिजेची प्राप्ति, आणि त्यांत काशींतल्या ओळखीचें स्मरण महाराजांनीं आपण होऊन दिलें; मग काय विचारतां? पुराणिकबावांच्या आनंदास पारावारच नाहींसा होऊन गेला असेल हें सांगणें नकोच. असो, ह्या पुराणिकबावांकडून महाराजांनीं अनेक तीर्थयात्रा करविल्या व निर्याणप्रसंगाच्यापूर्वीं सुमारें एक महिना त्यांना बदरीवनास पाठविलें होतें. स-

ध्यां हे पुराणिकबावा वार्शीस आहेत.

अक्कलकोटापासून सुमारें ९ कोसांवर भीमातीरीं खेडमणूर या नांवाचें एक गांव आहे. त्या गांवांत रहाणाऱ्या एका वैष्णवास महाराजांनीं अक्कलकोटास असतां व्यंकोबाच्या गिरीवर प्रत्यक्ष दर्शन दिलें. हा चमत्कार सदरील वैष्णव गिरीहून परत आल्यावर लोकांस कळला, आणि तेव्हांपासून हे वैष्णवबावा महाराजांच्या भजनीं लागले.

तीन चार वर्षांपूर्वी एका भक्तावर आलेलें संकट महाराजांनीं कसें निवारण केलें तें पुढें दिलेल्या हकीकतीवरून कळोन येईल. अक्कलकोटापासून तीन कोसांवर मैंदरगी या नांवाचा एक गांव कुरुंदवाडकर पटवर्धन यांच्या ठाण्याचा आहे. त्या गांवीं मामलेदार कचेरी व तुरुंग आहे. तुरुंगाच्या बंदोबस्तार्थ जे शिपाई आहेत त्यांच्यावर मुसलमान जातीचा एक जमादार होता. त्याची महाराजांवर विशेष भक्ति असल्यानें महाराज मैंदरगीस गेले असतां ते त्या जमादाराच्या घरीं रहाण्यास जात. एका दिवशीं महाराज या जमादाराचे घरीं गेले असतां रात्रौ तुरुंगाचा बंदोबस्त करून जमादार, महाराज आले आहेत ह्मणून त्यांची सेवा करण्याकरितां घरीं आला. त्याच रात्रीं मध्यान्हींचे सुमारास पहारेकऱ्याची नजर चुकवून एक कैदी पळून गेला. इतक्यांत भक्तवत्सल दयालु समर्थांनीं त्याजला हातीं धरून गडबडीनें उठविलें, आणि "जाजा निजलास काय, आपले काम पहा" असें बोलून त्याला दरवाज्याबाहेर काढले. जमादार तसाच लगबगीनें तुरुंगांत येऊन शोध करितो, तों एक कैदी पळून गेल्याची बातमी त्याला लागली. लागलाच तो घोड्यावर बसून कैदीच्या शोधास निघाला, आणि त्याला पकडून आणून पुन्हा तुरुंगांत कोंडला. हें इतकें काम करून जमादार घरीं येऊन पहातो तों महाराज नाहींत, व गांवांतहि कोठें असल्याचा पत्ता लागेना. इतक्या या कृतीवरून "परवर दिगार दत्त दर्या" असा स्वामीराजांविषयीं त्याचा निश्चय होऊन त्यानें आपली चाकरी मुलाच्या नांवानें करून दिली आणि आपण एका लहानशा घरांत महाराजांच्या पादुकांची स्थापना करून पूजा वगैरे हिंदु धर्माप्रमाणें करीत असोन महिन्याची अक्कलकोटास वारी करीत आहे. या जमादाराचें महाराजांनीं मीरसाहेब असें नांव ठेविलें आहे.

येथपर्यंत ज्या अद्भुत चमत्कारांचें वर्णन केलें ते कदाचित संभवनीय होतील. परंतु ब्रह्मदेवानें जी वस्तु निर्माण केली, तिजमध्यें कोणी

फेर करूं इच्छिल्यास त्याला तर होणार नाहींच, परंतु स्वतः ब्रह्मदेवालाहि अशी गोष्ट करण्यास अशक्य आहे. असें असतां तिजमध्येंहि महाराजांनीं बदल केला आहे!!! कडूलिंबाचा पाला गोड नाहीं हें सर्वांस माहीत आहेच, परंतु अमक्या ठिकाणीं कडूलिंबाचें झाड आहे, आणि त्याच्या एकाद्या तरी फांदीचा पाला गोड असल्याविषयीं कोणाच्या पहाण्यांत नाहीं इतकेंच नाहीं, परंतु कोणाच्या ऐकिवांतहि नाहीं. असें असतां ही प्रत्यक्ष साक्षा महाराजांनीं अक्कलकोटास करून ठेविली आहे.!!! आणि त्या झाडाच्या पाल्याची गोडीच पहाण्याच्या हेतूनें हजारों लोक अक्कलकोटास जाऊन खातरी करून घेऊन आले आहेत. हें लिंबाचें झाड गोडें करतेवेळेची हकीकत अशी आहे कीं, एका समयीं महाराज धाकट्या वेशीजवळ एक सरकारी विहीर आहे, त्या विहिरी नजीक एक लिंबाचें झाड आहे, त्या झाडाखालीं बसले होते. इतक्यांत मौजे रामपूर, तालुके सोलापूर, या ठिकाणचे रावसाहेब देशपांडे यांच्या कन्येस, समंधबाधेनें ती अति कृश झाल्यानें, दर्शनास आणली होती. मुलीला महाराजांच्या पायांवर घातली, तेव्हां त्यांनीं तिला कडूलिंबाचा पाला खाण्यास सांगितलें. याजवर बरोबर असणाऱ्यांपैकीं एकानें शंका घेतली, महाराज, पाला कडू असल्यानें खाववणार नाहीं. महाराजांनीं लागलेंच सांगितलें, या फांदीचा (बोट दाखवून) पाला गोड आहे, तिला (मुलीला) खाऊं दे. असें ऐकण्याबरोबर त्यांपैकीं लागलाच एकजण झाडावर चढला, आणि महाराजांनीं दाखविलेल्या फांदीचा पाला तोडून त्यानें खाऊन पाहिला, तो खाण्यासारिखा त्याला गोड लागला. हा विलक्षण अद्भुत चमत्कार त्या वेळेस त्या ठिकाणीं असणाऱ्या सर्व लोकांनीं पाहून त्यांनीं महाराजांचा जयजयकार केला. तेव्हांपासून या झाडाच्या मधल्या फांदीचा पाला खाण्यासारिखा गोड झाला तो झालाच. या गोष्टीस अदमासें दहा वर्षें होऊन गेलीं.

कसाहि समशेर बहादर व शत्रूस समरंगणीं प्रत्यक्ष काळासारिखा भयंकर आणि महान पराक्रमी राजा असो, महाराजांच्या समोर गेला कीं, त्यांच्या स्वरूपतेजाकडे समोर दृष्टि देऊन पहाण्याची त्याची प्राज्ञाच होत नसे. मोगलबादशाहीस पेशव्यांच्या जोरावर गोलंदाजीच्या कामांत प्रवीण अशा ज्या घराण्यानें हालवून सोडिलें होतें, त्या घराण्यांतील हल्लींचे लष्करचे (ग्वाल्हेरचे) राजे श्रीमंत अलिजाबहादर जयाजीराव शिंदे सरकार, हे महाराजांच्या दर्शनास अक्कलकोट येथें गेले असतां महाराजांच्या

चरणांवर नजर देऊन एक तासभर महाराजांनीं बोधपर केलेलें भाषण एकाग्रतेनें ऐकत होते. शिंदे सरकारचा अक्कलकोटास समर्थांच्या दर्शनास जाण्याचा योगायोग कसा घडून आला त्याजबद्दलची हकीकत अक्कलकोट येथील एका हुषार वकिलानें आह्मांस लिहून कळविली तिचा सारांश पुढें दिला आहे.

ता. २६ जुलई सन १८७१ रोजीं श्रीमंत सरकार अलिजाबहादर जयाजीराव शिंदे यांची स्वारी महाराजांच्या दर्शनास अक्कलकोट येथें गेली होती. हा अक्कलकोटास दर्शनास जाण्याचा बेत पंढरपुरास आल्यावर अलिजाबहादरांचा अकल्पित झाला, तेणेंकरून प्रभुचरणदर्शनाकडे अत्यंत उत्कंठता झाल्यानें राजकीय मानानें न जाता अती लीन वृत्तीनें जाण्याच्या हेतूनें आपली उतरण्यासवरण्याची वगैरे व्यवस्था लावण्याकरितां आपला एक वकील त्यांनीं अदले दिवशीं पुढें पाठवून दिला. वकिलानें अक्कलकोटचे त्या वेळचे कारभारी रा० रा० दिनकर आनंदराव पाटकर यांची भेट घेऊन अलिजाबहादरांचा स्वामीसमर्थांच्या दर्शनास येण्याचा हेतु असा कळविला कीं, गांवापासून कोस अर्ध कोस अंतरावर स्वामी महाराजांस नेऊन त्या ठिकाणीं महाराजांचें अलिजाबहादरांस दर्शन व्हावें. अलिजाबहादरांकडून वकील आले, त्या दिवशीं स्वामीसमर्थांची स्वारी राजवाड्यांत होती; आणि सदरहु प्रमाणें वकिलानें कळविलेला मजकूर श्रीमंत कैलासवासी लक्ष्मीबाई राणीसाहेब यांस विदित झाल्यावर त्यांनीं श्री स्वामीसमर्थांस राजवाड्या बाहेर नेण्याचें नाकारलें. कारण गांवांत कंडी पसरल्यावरून त्यांची अशी समज झाली होती कीं, शिंदे सरकार जबरदस्त आहेत, आणि ते स्वतः आले आहेत, त्या अर्थीं ते दर्शन घेण्याच्या मिषानें ह्मणून स्वामीसमर्थांना घेऊन जातील ते आपल्या बरोबरच त्यांना नेतील; आणि हा त्यांचा समज बलवत्तर होण्याला असें एक सबळ कारण होतें कीं, माजी श्रीमंत सरकार मल्हारराव गाइकवाड हे बडोद्याच्या गादीवर बसल्यावर स्वामीसमर्थांस बडोद्यास नेण्याच्या हेतूनें त्यांच्याकडून कांहीं मंडळी हजारों रुपयांच्या थैल्या बांधून बसली होती. त्यामुळें अलिजाबहादरांस स्वामीसमर्थांचें दर्शन करवून पुन्हां लागलेंच परत आणीन अशी कारभारी यास राणीसाहेबांची खातरी करून द्यावी लागली. आणि परवानगी मिळाल्यावर अक्कलकोटापासून एक कोसावर वाडी आहे, तेथील अंबराईंत अलिजाबहादरांस उतरण्याकरितां जागा नेमून, तेथें तंबू कनाती

वगैरे देऊन, सर्व प्रकारें उत्तम प्रकारची तयारी केली. त्या जागेंत वर लिहिलेल्या तारखेस अलिजाबहादरांची स्वारी थडकली. लागलीच अलिजाबहादरांनीं अक्कलकोटकर राजे यांजकडून मेजवानी घेतली. संकेताप्रमाणें महाराजांच्या दर्शनाची अपेक्षा करीत बसले. इतक्यांत तीन वाजण्याचा समय झाला.

इकडे राजवाड्यांत अक्कलकोटचे कारभारी व अलिजाबहादरांचे वकील हे स्वामी समर्थांची मर्जी सुप्रसन्न दिसून अलिजाबहादरांकडे जाण्याविषयीं विनंती करण्यास संधि केव्हां सांपडेल ती वेळ साधण्याच्या खटपटींत होते. स्वामीसमर्थांची त्या दिवशींची सुप्रसन्नता काय विचारावी? परदेशांतून पराक्रम करून १२ वर्षांनीं पित्याच्या दर्शनास पुत्र आला असतां पित्याची मुखश्री प्रफुल्लित होऊन पुत्राची भेट केव्हां होईल, हे जसें त्याला होऊन जातें, तद्वत त्या वेळची महाराजांची तबियत दिसली. समर्थांस शिंदे सरकारांकडे जाण्यास रथ तयार आहे इतकें सांगण्याची खोटी, स्वारी भरदिशीं उठून रथांत बसली, ती थेट अलिजाबहादर उतरले होते, त्या अंबराईंत जाऊन बाहेरच एका खुर्चीवर बसली. स्वामीसमर्थांची स्वारी आली, इतकी वर्दी अलिजाबहादरांच्या कानांवर जातांच, त्यांच्या चरणांवर आपलें मस्तक केव्हां जाऊन ठेवीन, आणि त्या समर्थांस आपल्या नेत्रानें पाहून त्या अप्रतिम स्वरूपसुखाचा लाभ केव्हां घेईन, इतकी उतावेळ होऊन गेल्यानें, अलिजाबहादर बसल्या ठिकाणाहून निघाले ते अनवाणीच समर्थांपाशीं धावत येऊन त्यांच्या चरणांवर त्यांनीं मस्तक ठेविलें. तेव्हां अलिजाबहादरांस समर्थांनीं स्वहस्तें उठवून बसण्याची आज्ञा केली. परंतु त्या दिव्य तेजाकडे अलिजाबहादरांस एक सारखें टक लावून पहावलें नाहीं. समर्थ अलिजाबहादरांजवळ त्या प्रसंगीं एक तास फार छानीचें व समजण्यास गुह्य नाहीं अशा प्रकारचें उपदेशपर भाषण करीत होते, आणि तें राजनीति, प्रजापालन, आणि खरें वैराग्य या विषयांवर असल्यानें, अलिजाबहादरांस अतिप्रिय होऊन तें त्यांनीं फारच लक्षपूर्वक ऐकलें. या वेळेस गणपतराव सरकारचे वकील व दुसरी मंडळी जवळ होती. एक तासभर अलिजाबहादरांजवळ भाषण करून समर्थांची स्वारी तेथून उठली, ती जवळच एक धनगराचें देऊळ आहे, तेथें गेली. त्यांच्या बरोबर अलिजाबहादरहि अनवाणीच गेले, आणि त्या ठिकाणीं आणखी एक वेळ दर्शन घेऊन निघाले ते अक्कलकोटाहून चालते झाले.

राजकारस्थानांत ज्याच्या बुद्धिकौशल्याचा दरारा आहे, असे बड्या पैकीं दुसरे श्रीमंत सरकार तुकोजीराव होळकर, आपल्या दोन पुत्ररत्नांसहवर्तमान अक्कलकोटकर राजे यांस अगाऊ सूचना देऊन स्वामीसमर्थांच्या दर्शनास सन १८७४ सालचे जानेवारी महिन्याचे १७ वे तारखेस गेले होते. होळकर सरकार अक्कलकोटास येणार ह्मणून अक्कलकोटकर राजे यांजकडून कडपगांवचे स्टेशनावर त्यांच्या राजकीय मानास योग्य असा लवाजमा ठेवण्यांत आला होता, राजेसाहेब एक मैलावर होळकर सरकारांस आणण्याकरितां सामोरे गेले होते. उभयतांच्या भेटी झाल्यावर होळकर सरकारास मोठ्या समारंभानें त्यांना उतरण्याकरितां खासजागेची जागा नेमिली होती तेथें आणून पोचविलें. होळकर सरकार १० वाजण्याच्या सुमारास समर्थांची स्वारी कर्जाळकर यांच्या वाड्याच्या पिछाडीस वटवृक्षाखालीं बसली असतां त्या ठिकाणीं उभयतां चिरंजिवांसहवर्तमान गेंले. होळकर सरकार दर्शनास गेले त्यावेळीं समर्थांची स्वारी अत्यानंदांत गर्क होती, आणि त्या आनंदलहरींत होळकर सरकारांस समर्थांनीं नारळाचा प्रसाद स्वहस्तें दिला. असा प्रसंग फारच क्वचित् प्रसंगीं लोकांच्या नजरेस पडला असेल. होळकर सरकार पुढें दोन दिवस अक्कलकोट येथें राहिले होते व तितक्या अवकाशांत ते समर्थांच्या दोन चार वेळां दर्शनास गेले होते. परंतु समर्थांनीं त्यांना काय उपदेश केला व केव्हां केला, हें कांहीं कोणाच्या पहाण्यांत आलें नाहीं. परंतु होळकर सरकारची समर्थांवर अत्यंत भक्ति बसल्याचें लोकांना दिसून आलें.

येथपर्यंत महाराजांनीं अक्कलकोटास असतां जे जे अद्भुत चमत्कार केले व त्यांजपैकीं आह्मांस जे पूर्ण विश्वसनीय लेखांवरून व पूर्ण भरंवशाच्या लोकांच्या मुखानें कळले, त्यांतील निरनिराळ्या मासल्याच्या अद्भुत चमत्कारांच्या मासलेवाईक कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत. यांहून निरनिराळ्या प्रकारचे अनेक मासले असतील, परंतु ते ज्यांच्याजवळ आहेत ते गुप्त ठेवीत असल्यानें तूर्त ते उदयास येण्याचा संभव नाहीं. असो एकंदरीनें ज्या गोष्टी प्रसिद्धीस आल्या आहेत, त्यांजवरूनच खरोखर विचारपूर्वक पाहिलें असतां स्वामीमहाराजांस कित्येक भक्तांच्या मताप्रमाणें दत्तावतारी न ह्मटलें, तरी वेदांतशास्त्राप्रमाणें ते पूर्ण ब्रह्मत्वाच्या ह्मणजे निराकारत्वाच्या पायरीस जाऊन पोंचले होते, आणि त्यामुळें ते जद्गुरूच्या पदवीस पोंचले होते, असें निसंशयपणीं ह्मणण्यास तिळप्रायहि दिकत

वाटत नाहीं. महाराजांच्या दर्शनास राव जात होते, त्याचप्रमाणें रंकहि जात होते. पुरूष जात होते, त्याचप्रमाणें स्त्रियाहि जात होत्या. पंडित जात होते, त्याचप्रमाणें मूर्खहि जात होते. हिंदु जात होते, त्याचप्रमाणें यवन, पार्शी, व युरोपियनहि जात असत. सारांश, महाराजांच्या दर्शनास अमुक एक जातीचा कोणी मनुष्य गेला नाहीं, असें झालेंच नाहीं, तथापि त्या सर्वांजवळ महाराजांचें वर्तन ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसारच असे. फार दिवस महाराजांसंनिध ज्यानें काळ घालवून महाराजांच्या वर्तनाचा एकंदर प्रकार आपल्या डोळ्यानें पाहिला, त्यानें त्यांच्याविषयीं अभिप्राय असा दिला आहे कीं:—

मौने मौनी गुणिनि गुणवान् पंडिते पंडितो वा
दीने दीनः सुखीनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी यो ऽवधूतेऽ वधूतः

अशा प्रकारचें महाराजांचें वर्तन होतें तर त्यांच्याविषयीं लोकांचीं अनेक प्रकारचीं मतें झालीं आहेत, यांत मोठेंसें नवल तें कोणतें? राजसूययज्ञाचे वेळेस सुयोधनाच्या कांहीं एक प्रकारच्या प्रश्नावरून श्रीकृष्ण परमात्म्यांनीं सुयोधनास व धर्मराजास अनुक्रमें सत्पात्र व कुपात्र एकेक ब्राह्मण कांहीं एक विशेष दान देण्याकरितां यज्ञास जमलेल्या ब्रह्मवृंदांतून निवडून आणण्याकरितां सांगितलें. तेव्हां सुयोधन व धर्म या उभयतांकडून परमात्म्यास एकच उत्तर आलें तें असें कीं, कृष्णजी, आपण सांगतां त्या जातीचा एकहि ब्राह्मण येवढ्या मोठ्या समाजांत दिसत नाहीं. तेव्हां कृष्णजी किंचित् हास्यमुद्रेनें सुयोधनाकडे पाहून बोलले, सुयोधना, येवढ्या मोठ्या समाजांत एकहि सत्पात्र ब्राह्मण तुला दिसत नाहीं; आणि पहा त्या धर्मराजास, इतक्यांमध्यें एक तरी कुपात्र दिसतो का? जात्या तूंच खोटा आहेस तेव्हां तुला चांगला दिसेल कोण? सारांश, अशा न्यायानें जितक्या मतांचे लोक स्वामीमहाराजांकडे गेले, तितक्या प्रकारचीं निरनिराळीं मतें महाराजांविषयीं झालीं असावींत हें उघडच आहे.

खऱ्या ठिकाणीं अनेक प्रकारचीं मतें असलीं, तरी त्या त्या मतांप्रमाणें, ज्याचा त्याचा महाराजांवर विशेष प्रकारचा अंतर्यामीं भाव बसत होता, ही मोठी विलक्षण आश्चर्याची गोष्ट आहे. पूर्ण विलासी व शृंगा-

री एकादी स्त्री किंवा पुरुष महाराजांकडे गेलीं असतां, तिचें किंवा त्याचें महाराजांना पाहून मन थंड झालें नाहीं, अशी गोष्टच कधीं झाली नव्हती. तिला किंवा त्याला वाटावें कीं, काय विलास व शृंगार तो खरोखर याच ठिकाणीं आहे. अन्यत्र ठिकाणीं नाहीं. त्याचप्रमाणें एकादा पंडित महाराजांकडे गेला असतां त्यासहि असें वाटावें कीं, वाग्देवतेचें पूर्ण तेज जें, तें जसें काय याच ठिकाणीं भरलें आहे! एकाद्या शूरास असें वाटावें कीं, आपलें शौर्य महाराजांपुढें व्यर्थ आहे. सारांश, कोणत्याहि प्रतीचा कोणीहि मनुष्य गेला, तरी त्याला असें वाटावें कीं, माझ्याच स्थितींतील महाराज असून ते मजपेक्षां सवाई आहेत ह्मणून ते मला वंद्य आहेत.

अशा प्रकारें निरनिराळ्या व्यक्तीबरोबर महाराजांचें समयावच्छेदेंकरून त्या त्या व्यक्तीस प्रिय असें वर्तन असल्यानें, प्रत्येक व्यक्तीस महाराज आपल्या वर्गांतील मुकुटमणीच भासत. ह्मणून अशा व्यक्तिपरत्वें स्थितीवरून पहातां महाराज अनंतरूपी होते हें तर उघडच सिद्ध होतें. तथापि त्यांनाहि पर्यायानें नांवें ठेवणारे कित्येक निंदक दुर्जन आहेतच! फार कशाला, द्वापारयुगांत देखील पूर्ण परब्रह्मरूप धारण करून मथुरा, गोकुळ, द्वारका, इत्यादि ठिकाणीं श्रीकृष्णजींनीं नऊ वर्षांच्या वयांत अनेक असंभाव्य गोष्टी करून दाखविल्या, ह्मणजे एक कालीं सर्व गोकुळांतील स्त्रियांबरोबर ६ महिन्यांची एक रात्र करून रंगरास व क्रीडा केली, त्याचप्रमाणें इंद्रानें गोकुळ बुडविण्याच्या इराद्यानें हत्तीच्या सोंडेएवढी पर्जन्याची धार सतत ६ महिनेपर्यंत चालविली होती, तिजपासून गोवर्धन पर्वत करांगुलीवर उचलून धरून गोकुळ राखलें. यमुनेच्या डोहांत जाऊन कालिया सर्पाचें मर्दन केलें, समुद्रांत एका रात्रींत द्वारका उत्पन्न करून तेथें सर्व यादवांस ठेवून आपण काळ यवनाचा संहार करण्यास निघाले. कंसास बाळपणीं मारलें. इतक्या गोष्टी सर्वांदेखत केल्या, तथापि दुर्योधन, जरासंध, वक्रदंत, शिशुपाळ इत्यादि दुर्जनांच्या मतें कृष्णजी हे त्यांना त्यांच्याहिपेक्षां जास्त दुर्जन भासत होते!!! ही तर द्वापारयुगांतली गोष्ट झाली. हल्लीं बोलून चालून कलियुग आहे. त्यांत तर शास्त्रमानानें दुर्जन लोकांचाच भरणा मोठा!!! असो.

महाराज अक्कलकोटांत आल्या दिवसापासून त्यांना अज्ञान ह्मणजे झोंप केव्हां येई हें कांहीं कोणाच्याच समजण्यांत आलें नाहीं. महाराज सदा सर्वकाळ निजानंदीं निमग्न असत. डोळ्यांवरून पांघरूण घेतलें,

ह्मणजे मात्र लोकांना स्वामीमहाराज निद्रिस्त झाले असें वाटावें. परंतु साऱ्या दिवसांत एक क्षणभर तरी त्यांना विस्मरण व्हायचें होतें ! ! ! प्रत्यहीं पहाटेस तीन किंवा चार वाजण्याच्या सुमारास महाराज तोंडावर पांघरूण घेऊन आपल्याशींच बोलत असत, किंवा श्लोक, किंवा दोहरे ह्मणत असत, त्यामुळें त्यावेळेस महाराज जागृत होत असें लोकांस वाटे. बोलण्यांत तीर्थांचीं व क्षेत्रांचीं नावें घेत. आणि महाराज जे कांहीं श्लोक ह्मणत असत, व त्यांजपैकीं कांहीं लोकांना जे पाठ झाले आहेत, ते महाराजांच्या मुखांतले प्रासादिक व निरंतर ह्मटले असतां कल्याणकारक आहेत अशा भावनेनें प्रयत्नानें जितके मिळाले तितके या स्थलीं सादर केले आहेत.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदं
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥ १ ॥
कार्तिवीर्यार्जुनो नाम विख्यातो भूमिमंडले
तस्यस्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात् ॥ १ ॥
नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मै नमो नमः
कार्तिके कृत्तिकायोगे यः कुर्यात् स्वामिदर्शनं
सप्तजन्म भवेद्विप्रो धनाढ्यो वेदपारगः ॥ १ ॥
पीठं यस्य धरित्री जलधरकलशं लिंगमाकाशमूर्तिः
नक्षत्रं पुष्पमाला ग्रहगणकुसुमं नेत्रचंद्रार्कवान्हि ॥ १ ॥
कुक्षौ सप्तसमुद्रं भुजगिरिशिखरं सप्तपातालपादं
वेदं वस्त्रं षडगं दशदिशि वसनं दिव्यलिंगं नमामि ॥ १ ॥
मूले ब्रह्मा मध्ये विष्णुः शाखायां च महेश्वरः
पत्रे पत्रे तु देवाश्च वृक्षराजाय ते नमः ॥ १ ॥
काशीक्षेत्रे निवासोयं जान्हवीचरणोदकं
गुरू विश्वेश्वरः साक्षात्तारकं ब्रह्म निश्चितं ॥ १ ॥
श्रुतिस्मृती न वक्तव्ये केवलं गुरूसेवनं
ते वै सन्यासिनः प्रोक्ता इतरे वेषधारिणः ॥ १ ॥
गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरूस्तथा
पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमः ॥ १ ॥

या शिवाय नित्य नवे असे पुष्कळ ह्मणत, परंतु ते कोणाला पाठ झाले नाहींत. स्वारी भजन करूं लागली ह्मणजे " शिवहरशंकर नमामि-

शंकर शिवशंकरशंभो, ये गिरिजापतिभवानीशंकरशंभो " असें नामस्मरण करी. कधीं कधीं " साईके दरबारमे साचेकुसिरपाव झुटेकुपनया, क्या रागी, क्या राजा, साईके साच, बंदीसे सद्भाव, कोइके शब्दाव, कोइके समुदाव " हा दोहोरा ह्मणत, शांताकारं, प्रातःकाले, इत्यादि सर्वश्रुत श्लोक होहि ह्मणत असत. केव्हां केव्हां " संतामहंता होती भेटी, हरूषे नाचूं वाळवंटीं" एवढेंच अभंगाचें कडवें ह्मणत असत. किंवा "जय देवी जय देवी" ही आंबेची आरती ह्मणत. किंवा एकादा सच्छिष्य महाराजा संनिध असून त्यावेळेस जागृत असल्यास त्याजबरोबर उत्तम प्रकारचें भाषण करीत. परंतु एकदा कां उजाडले कीं, हा सर्व प्रकार जाऊन निराळाच सुरू होई.

अशा प्रकारें जो पुरुष सदा सर्वकाळ आत्मरत असून व्यवहारिकाप्रमाणें वर्तन करीत असे त्या पुरुषाच्या विलक्षण तेजाकडे कोणाच्यानें पहावत नसे ह्मणून जें महाराजांस पहाणारांच्या तोंडून ऐकूं येतें त्याच्या खरेपणाविषयीं आह्मांस तिलप्रायहि संशय वाटत नाहीं. कारण दिवस रात्रींतून ज्या पुरुषास एक क्षणभरहि अज्ञान प्राप्त झालें नव्हतें, त्या पुरुषाचें तेज विजेलाहि दिपवून टाकील, मग त्या ठिकाणीं चर्मचक्षूंचा तो काय पाड? असें ज्याचें स्वरूपैश्वर्य, व जें इंद्रियतपोबलें प्राप्त झालें, त्याची बरोबरी एकादा सार्वभौम राजास तरी कशी करवेल? महाराजांच्या पदरीं रावापासून तो रंकापर्यंत सेवक होते, त्यायोगें महाराजांच्या तोंडून एकादा शब्द निघण्याचा उशीर, मग मी राव कीं रंक याचा विचार न करतां तो जवळ असणारानें झेललाच. काय विलक्षण सत्ता ही त्या पुरुषाची होती!!! सहज स्वारी बाहेर निघाली कीं, सर्वराजाचिन्हांनीं मंडित दिसावी. छत्रचामरें, पालख्या, म्याने, घोडे, गाड्या, गाई ह्मशी इत्यादि खिल्लार, तंबू, कनाती, नगरखाना, वाजंत्री, रणवाद्य (शिंग) व सेवेकरी आणि यात्रेकरू लोकांच्या पलटणी, त्याचप्रमाणें पुराणिक, हरिदास, गवय्ये, कळवंतिणी, तमासगीर, नाटकवाले, त्याचप्रमाणें फुलवाले, फुलारी, मिठाईवाले, व सर्व प्रकारचे दुकानदार बरोबर आहेतच!!! मग महाराज एकादे वेळेस जंगलांत कां वस्तीला जातना, बरोबर हा इतका सरंजाम असावयाचाच. त्यायोगें महाराजांची ज्या स्थळीं वस्ती व्हावी, तें स्थळ प्रेक्षकास जसें कांहीं ग्रंथांतरीं वर्णन केलेल्या वैकुंठलोकाप्रमाणें भासावें!! महाराज ज्या ज्या गांवीं एकादे वेळेस जात, त्या त्या गांवांत त्या त्या वेळेस

जसा कांहीं वार्षिक जत्रा भरल्याचा लोकांस भास व्हावा! कारण ज्या गांवांत उभ्या वर्षांत दहा मनुष्यें एका वेळेस जमण्याचा योग येण्याचा संभव नसे, त्या गांवांत महाराजांच्या जाण्यानें एकादे दिवशीं हजारो लोक व नानाप्रकारचे लोक एकत्र जमावेत !!! आणि समर्थांच्या नांवाचा जयजयकार होऊन सर्वभर एकच आनंद व्हावा. अशा प्रकारचा आनंद नेहमीं अक्कलकोटास असल्यानें दुःखानें तेथून पलायन करून सुखानेंच जशी कांहीं त्या स्थलीं वस्ती केली होती असा भास होई !!!

भक्तांचा महाराजांवर अतिशय प्रेमा असल्यानें महाराजांची ते फारच उत्तम प्रकारची सेवा करीत. वेळेवेळेची कामगिरी आपापसांत त्यांनीं वाटून घेऊन त्या त्या वेळेला जे ते तत्पर असत. प्रभातकाळ होण्याच्या वेळेस चौघडा व वाजंत्री यांची हजिरी सुरू व्हावी. मग महाराज उठल्या पासून त्यांच्या तबियतीप्रमाणें जो जो नित्यक्रम करण्याचा त्यांचा रंग दिसावा, त्या त्या रंगाप्रमाणें सर्व तयारी करून सेवकजन वाटच पहात उभे असावेत. लहर लागल्यास नैवेद्य ग्रहण केल्यावर स्वारी एकाद्या जागेवर कायमची बसल्यासारखी झाली कीं, सकाळच्या प्रहरीं पुराण वगैरे सुरू व्हावें, किंवा गवय्याचें गाणें सुरू व्हावें. सायंकाळीं व रात्रौ कीर्तनाचा, अगर गाण्याचा, अगर नाटकाचा, अगर तमाशाचा, वेळेस जें हजर असेल त्याचा थाट उडावा. परंतु अमुकच वेळेस अमुक व्हावें असा कांहीं त्या ठिकाणीं नेम नसे. ज्यानें त्यानें आपापली संधी पाहून हजिरी लावावी हाच काय तो त्या दरबारांत नेम होता.

असो; चर्मचक्षूंना सहन न होण्यासारिखें जरी महाराजांचें तेज होतें, तथापि भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां ते सौम्य तेज प्रगट करीत असत. अशी सौम्य व तेजःपुंज मूर्ति पहाण्याबरोबर कोणाचेंहि मन त्या मूर्तीला सोडून जाण्याविषयीं प्रवृत्त होत नसे. चेहेरा मोठा भव्य, आकर्ण नेत्र, सरळ नाक, विशाल कपाल, आजानुबाहु व कांति लिंबासारखी सतेज असून फारच नाजुक. हे शरीरावयव व त्यांचा तो नाजुक व भव्यपणा पहाण्याबरोबरच समाधान वाटण्या सारखें होतें. कित्येक पुष्कळ फिरलेल्या लोकांचीं मतें अशीं आहेत कीं, दक्षणोत्तर व पूर्वपश्चिम सर्व हिंदुस्थानांत धुंडाळलें तरी अशी अवयवरचना व तेजःपुंजकांति अन्य ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं इतकेंच नाहीं, परंतु असे रेखलेले अवयव एकाद्या उत्तम चितान्यानें चित्रांत वठिवलेलें एकहि चित्र दृष्टीस

पडत नाहीं.

मिति चैत्र शुद्ध १५ शके १८०० रोजीं महाराजांचें देहावसान होण्याचें प्रथम चिन्ह लोकांच्या दृष्टीस पडलें. त्या दिवशीं महाराज रा. रा. तात्यासाहेब सुभेदार यांच्या घरीं निजले असतां तिसऱ्या प्रहराचे सुमारास एकाएकीं उठून बिछान्यावर बसले; आणि जवळच एक लहानशी दगडाची कुंडी पडली होती ती उचलून डोकीवर घेण्यास मोघम आज्ञा केली. महाराजांच्या आज्ञेला गुंडाळून ठेवील कोण ? झरदिशी सेवेकरी धावून त्यांजपैकीं एकानें ती कुंडी उचलून डोकीवर घेतली; इतक्यांत महाराज उठून धाकट्या वेशीबाहेर एक मोठा तलाव आहे, त्याच्या पायऱ्यावर जाऊन बसले. मागोमाग कुंडी डोकीवर घेतलेला सेवेकरी व दुसरी मंडळी नेहमीं प्रमाणें होतीच. त्या कुंडी घेतलेल्या सेवेकऱ्यास महाराजांनीं ती कुंडी धक्का न लागतां हळूच पाण्यांत सोडून देण्यास आज्ञा केल्याप्रमाणे त्यानें तसें केल्यावंर सभोंवतालच्या मंडळीस तोंडचा शंखध्वनि करण्यास महाराजांनीं सांगितलें. मंडळी आज्ञेस तत्परच. नंतर स्वारी तेथून उठली ती जवळच मुरलीधराचें देवालय आहे तेथें अस्तमानच्या सुमारास गेली. ही वेळपर्यंत महाराजांच्या देहास कोणत्याहि प्रकारची शारीर विकृति नव्हती. परंतु रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमारास महाराजांस थंडी वाजून आली, आणि कडकडावून ताप भरून आला होता. तथापि त्याजबद्दल कोणापाशीं कांहीं एक न बोलतां स्वारी सकाळीं उठली ती महारवाड्यानजिक स्मशानभूमि आहे, तेथें जाऊन बरोबरच्या लोकांस त्यांनीं दोन तीन चिता दाखविल्या, आणि त्या कसल्या आहेत तें पाहून लक्षांत ठेवण्याविषयीं सांगितलें. स्मशानांतून स्वारी जी निघाली ती जवळच एक कोसावर नागणहल्ली या नांवाचें खेडें आहे त्या वाटेनें चालली. या वेळेस दोन प्रहराचा समय होऊन गेला होता, तथापि महाराजांचें स्नान, भोजन वगैरे कांहीं एक झालें नव्हतें. परंतु अमुक करा असें बोलण्याची प्राज्ञा कोणाची नसे. वाटेवरच एक सरकारी शेरी जमीन आहे. त्यांत एक गुराचा गोठा आहे, तेथें जाऊन बसले. महाराज तेथें जाऊन बसल्याबरोबर नेहमींप्रमाणें महाराजांकरितां बिछाईत तयार करण्याचें काम कांहीं सेवेकऱ्यांनीं सुरू केलें. तें पाहून महाराज म्हणाले, "आतां आम्हांस बिछान्याची वगैरे कांहीं जरूर नाहीं. त्याला समोरच्या झाडावर नेऊन आग लावा." हे महाराजांच्या तोंडचे शब्द ऐकून कांहीं धूर्त मंडळी

मनांत चरकली. परंतु महाराजांच्यासंबंधानें कोणाच्याच मनांत कांहीं आलें नाहीं. दुसरे दिवशीं ह्मणजे चैत्र वद्य ३ या रोजीं स्वारी अक्कलकोटास आली. ती कर्जाळकर यांच्या वाड्याच्या पिछाडीस वडाचा वृक्ष आहे तेथें गेली. तेव्हां महाराजांच्या अंगांत ज्वर होतांच, परंतु त्यास किंचित्‌हि न जुमानतां नित्याप्रमाणें हासणें, बोलणें वगैरे प्रकारांत कांहीं न्यूनता झाली नाहीं. पंचमी अगर षष्टीच्या सुमारास महाराजांस आमांशाचा विकार झाला. तेव्हां पासून खाण्यांत मात्र फरक पडत चालला. अन्न पूर्वीप्रमाणें जाईनासें झालें. मर्जीचा रंग पाहून एकादे वेळेस वरण भात घालीत. स्नान महाराजांनीं कधीं वर्ज केलें नाहीं, परंतु बेजार प्रकृतीमुळें स्नान करूं नये असें महाराजांस कोणीं सुचविलें, तर ते लागलेच "मी मेलों तर तुझ्याबाचें काय गेलें" असें बोलत. आमांशावर रा. हणमंतराव घोरपडे अक्कलकोट डिस्पेन्सरीचे डाक्तर, यांनीं औषध दिल्यावर तो बंद जहाला, परंतु ज्वर अंगांत राहून खोकला अधिक चाळवला, तेव्हां न्यायाधीश व मामलेदार यांनीं सोलापुराहून रा. रा. नाना वैद्य यांस आणविलें. त्यांनीं पुष्कळ औषधोपचार केले, परंतु विशेष उपयोग कांहीं झाला नाहीं. वाऱ्यांत न बसणें, किंवा स्नान वर्ज करणें, किंवा औषध घेणें वगैरे गोष्टी कोणी सांगूं लागल्यास ते ऐकतच नसत. एकादशीस महाराजांस श्वास लागला, तेंव्हां पासून मात्र त्यांची प्रकृति अतिशय बिघडूं लागली. तथापि महाराज कधीं कण्हले नाहींत, व मला अमुक प्रकारच्या वेदना होतात, असें एकाहि जवळ बोलले नाहींत इतकेंच नाहीं, परंतु त्यांच्या मुखचर्येवरून त्यांना अंतर्यामीं कांहीं वेदना होताहेत असेंहि कोणाला बाह्यात्कारी दिसत नव्हतें. इतकी जेव्हां महाराजांची अवस्था झाली, तेव्हां रा. नारायण वासुदेव बर्वे, न्यायाधीश, व रा. बाबूराव विष्णु मामलेदार, व इतर प्रमुख मंडळीनीं महाराजांकडून कांहीं दानधर्म वगैरे करवावा अशा विचारानें वे. शा. सं. रामाचार्य अवधानी, व गणेश राम जोशी वगैरे शास्त्रीमंडळीस बोलावून संकल्पपूर्वक महाराजांकडून प्रायश्चित्तें करविलीं. त्या वेळेस महाराजांनीं मोठ्या उत्साहानें प्रत्येक संकल्प स्वमुखानें उच्चारून दानधर्म केला, आणि वेदोक्तमंत्र ह्मणावे अशी शास्त्रीबावा वगैरे मंडळीस महाराजांनीं आज्ञा केली. नंतर महाराजांचो अंगावर घेण्याजी एक मोठी जरीकाठी शालजोडी होती, तिचा एक पदर भिजवून त्यांनीं स्वहस्तें व संकल्पपूर्वक रामाचार्य यांस दिली. महाराजांना उत्तरोत्तर अधिकाधिक श्वास होत

चालला होता ह्मणून वडाखालच्या उघड्या जागेवरून महाराजांनीं घरांत जाऊन निजावें अशाबद्दल मामलेदार यांनीं महाराजांची प्रार्थना केली, परंतु तिचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्यानांहि पहिल्या प्रमाणेंच उत्तर मिळालें. द्वादशीची रात्र उलटून गेली, आणि त्रयोदशीचा दिवस उजाडला, तथापि कांहीं विपरीत गोष्ट त्या दिवशीं घडून येईल असें कोणालाहि वाटलें नव्हतें. दोन प्रहराचे सुमारास गाई, वासरें, बैल, व घोडीं महाराजांची ह्मणून जीं बाळगिलीं होतीं, तीं महाराजांनीं आपल्यापुढें आणवून त्या दिवशीं जितके नैवेद्य महाराजांना आले होते, ते सर्व त्या जनावरांना चारविले, आणि आपलीं सर्व वस्त्रें त्यांनीं त्या जनावरांच्या अंगावर घालण्यास आज्ञा केली. इतका प्रकार होत आहे, तों महाराजांचा शब्द खोल जात चालला. तें पाहून एका सच्छिष्यानें आह्मांस आतां आज्ञा काय ह्मणून विचारतां क्षणींच गीतेतील श्लोक

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाःपर्युपासते
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं ॥

ह्मणून दाखविला; आणि डावे अंगावर पडले होते, ते उजव्या अंगावर झाले, व आपल्यास उठवून बसविण्याविषयीं महाराजांनीं आज्ञा केली. अशी आज्ञा होतांच सेवकजनांनीं महाराजांस हात देऊन उठवून बसविलें. महाराज बसले आणि निजानंदीं निमग्न झाले.

महाराजांनीं कर्जाळकराच्या वाड्यांत वडाखालीं ज्या स्थलीं देह ठेवला तेथें लहानसें देऊळ बांधून त्यांत महाराजांच्या नेहमींच्या पायांतील पादुकांची स्थापना केली आहे. हें लहानसेंच परंतु टुमदार देवालय हैद्राबाद येथील राजे रायरायवाले दप्तरदार यांनीं बांधिलें. त्या देवळावर एका संगमरवरी दगडावर खालीं लिहिल्याप्रमाणें लेख करून ठेविला आहे.

"श्री"

"शके १८०० चैत्रमास कृष्णपक्ष १३ शी मंगळवारीं चतुर्थ प्रहरीं वटवृक्षाखालीं श्री स्वामीसमर्थ निजानंदीं निमग्न झाले."

बोलतां बोलतां महाराज सर्वांदेखत डोळे झाकून निजानंदीं निमग्न झाले, असें पाहून जवळ असलेल्या लोकांनीं मोठा आकांत करून सोडला. निमिषार्धांत ही हृदयछेदक बातमी गांवांत पसरली, मग काय विचारता! एकच रडारड होऊन हालकल्लोळ माजला!!! त्या योगें असा भास होई कीं, ह्या अघटित दुःखाच्यायोगें अश्रुपातानें नेत्र निस्तेज होऊन अक्कल-

कोट वाहून जावें असा विधात्यानें नेम केला होता कीं काय? धरित्री भिजू-
न चिंब झाली!!! स्त्रीपुरुष भाव मोडून त्या दुःखसमुद्रांत सर्वच स्वामी-
रूप बनून गेले!!! महाराज, महाराज, महाराज, अशा आक्राळविक्राळ
स्वरानें सर्व आकाश भरून जाऊन दशदिशा धुंद होऊन गेल्या!!! कोणी
धाडदिशी जमिनीवर अंग फेकून देत, कोणी केस उपटीत, कोणी ऊर
बडवून घेत, कोणी कांहीं, कोणी कांहीं, अशा प्रकारानें ज्याच्यात्याच्या परी
दुःखाचा विलाप चालला होता; अशा समयीं कोणीं ह्मणून कोणाची सम-
जुत करण्यास जावें? सर्वांचा दुःखविषय एक होता. त्या तप्तकांचनवत्
तेजःपुंज समर्थांच्या देहकांतिकडे पाहतांच सजीवपणाचा भास होऊन एक-
दा तरी एकादा शेवटाला शब्द महाराजांनीं बोलावा ह्मणून अति लीन व
गहिंवरयुक्त आणि काकुळतीनें कित्येक हंबरडा फोडीत, परंतु काय उपयोग?
तें दिव्य तेज पंचमहाभूतांत जाऊन मिळालें तें मिळालेंच!!! ईश्वरी लीला
काय अघटित आहे? अशा प्रकारें जिकडे तिकडे दुःखाचा कडेलोट झा-
ला आहे, तोंच अकस्मात शांतिरूप मेघांचे मंद मंद तुषार येऊं लागून
दुःखरूपी प्रदीप्त झालेल्या अग्नीचें शांतवन होऊं लागलें!!! लागलीच पु-
ढारी मंडळी पुढें सरसावली. रामा सुतार व दुसरे यांनीं लाकडांचें उ-
त्तम प्रकारचें विमान तयार केलें. दुसऱ्यांनीं केळीचे खांब व नारळीचीं
पातीं लावून वर नानाप्रकारच्या फुलांनीं तें गुंफलें; आणि आंत सुवासिक-
पुष्पसिंहासन महाराजांस बसण्यास तयार केलें. इकडे शास्त्री मंडळी उ-
ठून त्यांनीं शास्त्रोक्त महाराजांस अभिषेक केला, आणि सर्व अलंकार व
पोशाग करून धुपार्ती व शेवटली आर्ती सर्व लोकांनीं मिळून मोठ्या आनं-
दानें व गजरानें केली!!! या वेळच्या देखाव्याचें वर्णन करण्यास प्रत्यक्ष
सरस्वतीनें लेखणी हातीं धरली पाहिजे! हा समारंभ आटपतो आहे, तोंच
बाहेर स्वारीची कडेकोट तयारी होऊन राहिली. डंका, निषाने, जरीप-
टक्याचे हत्ती, अंबारीचे हत्ती, शृंगारलेले घोडे, पालख्या, म्याने, घोडेस्वा-
र, पायदळ, तोफखाना, इत्यादि सर्व लव्याजम्यानिशीं, सरदार व मानकरी
भरपोशागानिशीं मिरवण्याकरितां तयार उभे राहिले होते. अशा राजकीय
थाटानें, व भजनाचा गजर करीत आणि दारू सोडीत महाराजांस विमानां-
त बसवून सावकाशीनें मिरवत मिरवत बुधवार पेठेंत चोळाप्पाच्या देवालयां-
त अगोदरच गुहा तयार करून ठेविली होती तेथें नेलें, आणि तिचें द्वार
उघडून सर्व अलंकारांसहवर्तमान महाराजांस त्या स्थलीं मोठया समारंभानें

बसविलें.

ही दुःखदायक बातमी तारायंत्रद्वारें, टपालांतून व वर्तमानपत्रद्वारें जसजशी चोहोंकडे फैलावत गेली, तसतसा तिनें किती आक्रांत करून सोडला असेल याचें अनुमान करण्याचें आह्मी वाचकांवरच सोपवितों. ही बातमी ऐकिल्या दिवसापासून महाराजांच्या कित्येक सद्भक्तांनीं कित्येक दिवसपर्यंत अन्नत्याग केल्याचें आमच्या कानीं आलें आहे. कित्येक संसाराचा त्याग करून "हरि हरि" करीत अरण्यांत जाऊन बसले आहेत. कित्येकांस चैन पडेनासें होऊन तीर्थयात्रा करीत फिरत चालले आहेत. कोणी अमुक ठिकाणीं महाराज प्रगट झाले, अशा बातमीवर तिकडे धाव घेत जात आहेत. सारांश महाराजांच्या लौकिकी अदृश होण्यानें खऱ्या खऱ्या भक्तांस इच्छित स्त्रीविषयव्यसनाप्रमाणें वैराग्यव्यसन लागून, आणि तें खऱ्या ज्ञानानें, निवृत्ति संगमाची वाट धुंडाळित आहेत!!! नमस्कार असो त्या सद्भक्तांस. त्यांच्या चरणरजांपासून जगाचा उद्धार होवो. महाराज निजानंदीं निमग्न झाले असें ह्मटलें असतां याजवर अनेक कुटिल कल्पना आहेत. तथापि त्यांचा आह्मी येथें विचारच करीत नाहीं. परंतु त्या कल्पना काढणारांस आह्मी इतकेंच सुचवितों कीं, ज्याच्या अंगीं इंद्रियदमन करण्याचें विलक्षण सामर्थ्य होतें; आणि इच्छिल्यास प्रतिसृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य होतें असें कडूलिंबाचें झाड गोड केल्यावरून अनुमान होतें, त्या पुरुषानें पंचमहाभूतांतील आत्म्याचे व्यापार बंद केल्यानें त्याचें ज्ञान केव्हां तरी नष्ट होण्याचा संभव आहे काय? नसेल तर व्यर्थ कल्पना काढण्यानें देहाला व्यर्थ शीण देऊं नये हें उत्तम होय; असो.

महाराजांच्या भजनीं असणाऱ्या लोकांपैकीं ज्यांच्या ज्यांच्या अवलोकनांत चरित्राचा पहिला भाग आला आहे, त्यांनीं त्यांनीं महाराजांच्या प्रसादानें आमचा अमुक अमुक इच्छितकार्यभाग झाल्याबद्दल आह्मांस कळविलें आहे. परंतु त्यांजपैकीं बहुतेक गोष्टी एकाच धोरणावर असल्यानें विस्तारभयास्तव त्यांचा येथें समावेश केला नाहीं; सबब ते चरित्रलिहिणारास माफी करतील. चरित्र लिहिणारास महाराजांनीं स्वप्नीं दर्शन दिलें ह्मणून जो त्यानें प्रथम भागांत लेख केला आहे, तो अक्षरशः खरा आहे, अशा बद्दल एका मोठ्या हुद्यावर असणाऱ्या, व दुसऱ्या एका राजकुलोत्पन्न असणाऱ्या अशा दोन गृहस्थांनीं लिहून कळविलें आहे. ह्या गोष्टींच्या प्रसिद्धीनें महाराजांवर लोकांची अंतःकरणपूर्वक भक्ति कशी जागृत आहे हें

दृष्टीस पडतें!!! अशा अवतारी अगर इंद्रियदमन करणाऱ्या पुरुषावर लोकांची भक्ति जर जागृत आहे, तर लोकांनीं होऊन अशा पुरुषाच्या मानास योग्य असें एकादें चिरकाल रहाणारें स्मारक कृत्य करून न ठेवणें हें लौकिकदृष्ट्या त्यांना लांछनीय नाहीं काय? स्वजनाभिमान आणि स्वदेशप्रीति इत्यादि अलौकिक गुणांचा स्फूर्तीमध्यें असणारा अंकुर सध्यांच्या प्रसंगीं कलिराजा निर्मूळ करून टाकीत असतां, समजून उमजून त्याला आड न येतां, कुतर्क काढून व अर्थावांचून व्यर्थ अभिमानानें त्यालाच मदत करावी यांत तो कोणता पुरुषार्थ आहे? थोर पुरुषाचें स्मारककृत्य करून ठेवल्यापासून त्या पुरुषास अशा कृत्यापासून कांहीं लाभ नसतो, परंतु अशा पुरुषाचें स्मारक कृत्य असल्यानें, तें त्या पुरुषाच्या अंगीं असणाऱ्या अलौकिक गुणांचें चिरंजीव दर्शक असल्या कारणानें वळण घेण्याकरितां कित्त्यादाखल होतें. आपल्या देशाची भरभराटी व्हावी, आणि स्वजनांचा उत्कर्ष व्हावा, असें खरोखर ज्यांच्या मनांत असेल, त्यांनीं इंद्रियदमन करण्याबद्दल या चरित्रनायकाचा कित्ता घ्यावा, आणि विशेषेंकरून आमच्या एतद्देशीय राजेरजवाड्यांनीं तर घेतलाच पाहिजे. नाहीं तर माजी मल्हारराव गाइकवाड यांच्या स्थितीस जाऊन पोंचण्याची वेळ येईल!!! आमच्या राजेरजवाड्यांच्या अंगीं इंद्रियदमन नसल्याकारणानें स्वतः त्यांजविषयीं व त्यांच्या आसपास काय चालतें याचीहि त्यांना दाद लागत नाहीं!!! प्रथम भागाच्या शेवटीं अक्कलकोटास महाराजांच्या नांवानें समाधीसमोर सभामंडप व भोंवतालीं धर्मशाळा बांधण्याच्या कामीं तेथील पुढारी लोकांत विचार चालू असून वर्गणी जमा करण्याचें काम सुरू आहे. त्या कामास मदत करावी, अशा अर्थाचीं ४५ छापील पत्रें राजेरजवाड्यांकडे त्यांच्या दिवाणजींच्या नांवानें रवाना करण्यांत आलीं होतीं; परंतु त्यांजपैकीं सांगलीकरांच्या नांवाचें पत्र वर पत्ता बरोबर नसल्यानें परत आलें, त्याजवरून बाकीचीं ४४ पत्रें ज्यांचीं त्यांस पोंचलीं असें अनुमान होतें, तथापि त्यांजपैकीं एकाहि पत्राची अद्याप दाद लागल्याचें दिसत नाहीं! ह्या असल्या स्वजनप्रीतीच्या थोरवीचें वर्णन कसें ह्मणून करावें? असो. या चरित्राच्या वाचकांस चरित्र लिहिणाराची अशी विनंती आहे कीं, हस्तें परहस्तें या सत्कृत्यास ज्याच्यानें होईल तितकी त्यानें द्रव्यद्वारा मदत करून हें काम लवकर शेवटास न्यावें. या सत्कृत्याच्या कामास गरीबगुरीब लोकांकडून त्यांच्या शक्तीप्रमाणें थोडी बहुत जितकी

मदत मिळण्याची आशा आहे, तितकी पैसेवाले लोकांकडून आह्मांस वाटत नाहीं, आणि त्यायोगें पैसेवाला खरा, परंतु सत्कृत्याच्या कामीं खर्च करण्यास ज्याला औदार्य प्राप्त होत नाहीं, तो श्रीमान नसून भिकाऱ्यांतील पहिल्या प्रतीचा भिकारी असें आह्मी समजतों. मग तो राजाहि कां असेना? हें काम पुरें करण्याची काय आमची मदार तीं सर्वथैव आमच्या गरीब परंतु औदार्य श्रीमंत लोकांवर आहे, आणि "दसका लकडी औार एकका बोजा," या न्यायानें ते ती पुरी करोत.

या पुरुषानें देहाभिमान धरणाऱ्या जीवतत्वास ईश्वरपदास कसें नेऊन पोंचवावें, व त्यायोगें त्या पदास योग्य असणारे मान नरदेहास कोणत्या प्रकारें घ्यावें वगैरे गोष्टी फारच उत्कृष्ट रीतीनें जगतास दाखविल्या ही गोष्ट कोणीहि कबूल करील. हजारों लोकांनीं या देहधारी पुरुषास साक्षात् चालता बोलता देव असें मानून षोडशोपचारें करून त्याचें पूजन केलें, आणि ते या पुरुषानें निर्भयपणें व अत्यंत प्रेमानें ग्रहण केलें!!! तें पाहून मूर्तिरूपानें मौन धरून बसलेल्या दैवतांनीं तोंडांत बोटें घालून ठेविलीं असतील!!! कारण मूर्तीरूप देवतांना जो मान दुर्लभ तो देखील या पुरुषानें नरदेहांत घेतला, आणि तो स्वपराक्रमावर, ह्मणून या पुरुषास "नरनारायण" अवतारी असें ह्मणणें शोभतें, कारण "नर करणी करे तो नरका नारायण बने" या ह्मणीला या पुरुषानें अक्षरशः सत्यत्वास आणिलें, असो.

या भागांत ज्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत, त्या सर्व दुसऱ्यांच्या संबंधाच्या असल्यानें वाचकांस चारित्रें लिहिणाराच्या स्वानुभवाच्या संबंधानें कांहीं तरी ऐकण्याची अपेक्षा उत्पन्न होईल हें उघडच आहे, आणि चरित्र लिहिणारानें भावी उत्पन्न होणाऱ्या अनर्थांवर लक्ष देऊन वाचकांस आपला स्वानुभव सांगण्यास भीतीनें मागें सरणें न्यायास विरुद्ध आहे. श्री स्वामीमहाराजांनीं स्वप्नीं दर्शन दिलें, त्या वेळेपासून आज १३ महिन्यांच्या मुदतींत वयाच्या मानानें, व ही वेळपर्यंत कोणत्याहि इंद्रियांत न्यूनता भासत नसून, पूर्ववत तीं व्यापार करणारीं असतां, त्यांच्या अंगभूत असलेले काम, क्रोध, लोभ, भय, मद आणि मत्सर इत्यादि इंद्रियदमन शत्रूंवर व्यवहाररीतीनें अंमल कसा बसवावा, याची एकेक किल्ली ते देत आहेत. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं इंद्रियांच्या मस्तीनें एकादे वेळेस मनाचा अंमल बसत नाहीं, त्या ठिकाणीं लिहिण्यास अवघड अशा अद्भुत चमत्कारांनीं प्र-

भुजींनीं लीला दाखवून प्रसंगाप्रमाणें एकेक विकल्प मनोराज्याबाहेर काढून टाकण्याची कृपा करण्याचा त्यांचा रोख दिसतो. इतकाच काय तो सध्यांच्या मितीस चरित्र लिहिणारास महाराजांच्या संबंधानें स्वानुभव आहे.

हें स्वामीचरित्र विघ्ननाशक श्रीगणपति व विद्याविलासी शारदा या उभयतांनीं, श्रीगुरुप्रसादकृपेंकरून, आरंभलेलें काम शेवटास नेलें, त्यांच्या चरणीं गुरुआज्ञेनें चरित्र लिहिणाराचा शुद्धांतःकरणानें नमस्कार असो. त्याचप्रमाणें माता व वडील आदिकरून जोशी व भागवत कुलोत्पन्नांतील सर्वांस, व देव आणि साधुसंत या सर्वांस चरित्र लिहिणाराचा शुद्धांतःकरणानें नमस्कार असो. श्रीगुरुस्वामीमहाराजांच्या कृपेनेंच हें चरित्र पुरें झालें आहे, तें त्यांचे त्यांना प्रिय होवो, आणि याच्या देणगीबद्दल कांहीं द्यावें असें समर्थांस वाटल्यास, चरित्र लिहिणाराचें त्यांच्यापाशीं एवढेंच मागणें आहे कीं, देहेच्छाप्रमाणें देहाचीं व्हावीं तीं कार्यें घडोत, तथापि देह मी अशा अज्ञानपणानें त्या मुख्य तत्वास विपरीत भावना न होवो.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

अक्कलकोट येथें स्वामीमहाराजांच्या समधीसमोर सभामंडप व भोंवताली धर्मशाळा बांधण्याच्या कामास अदमासें लागणारी २५ हजार रुपयांची रक्कम जमविण्याबाबद अक्कलकोट येथील कांहीं लोकांनीं खटपट चालविली असल्या बद्दल प्रथम भागांत लिहिलें आहे, व कोणीं किती मदत देण्याचें कबूल केलें आहे त्यांचीं नांवेंहि त्या भागांत नमूद केलीं आहेत. प्रथम भागांत सुचविल्याप्रमाणें अक्कलकोटास तेथील कारभारी यांजकडे ज्या लोकांनीं रकमा पाठविल्या ह्मणून आह्मांस कळविलें, व ज्यांनीं अक्कलकोटास पाठविण्याकरितां आमच्या जवळ दिल्या त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

अक्कलकोट.

रा. रा. बाबाजी महादेव देशपांडे, गुडस क्लार्क, शेवगांव रु. १०-०-०

,, ,, बळवंत वामन वैद्य, मार्स सिग्नलर ,, ,, ५-०-६

मुंबई.

रा. रा. मदन बापु जावळे, क्लार्क कमिशनर्स अकौंट डिपार्टमेंट ,, ५-०-०

,, ,, गणपतराव हरिचंदजी राजापूरकर. ,, ५-०-०

श्रीमंत अप्पासाहेब भोंसले राजे, सावंतवाडीकर, सध्यां वस्ती महाड, यांनीं समाधीच्या कामास यथाशक्ति मदत करण्याविषयीं चरित्र लिहिणारास पत्रानें सुचविलें आहे.

## वर्गणीदार गृहस्थांचीं नांवें

मुंबई.

रा. रा. विनायक विठोबा धैयवानें.
,, ,, लक्ष्मण रामकृष्ण तोरणे.
,, ,, कृष्णराव जगन्नाथ. ........
,, ,, भास्कर बाळकृष्णजी. ....
,, ,, रघुनाथ जनार्दन .........
,, ,, केशव जनार्दन दाते. ..
,, ,, विश्वनाथ भानरूक. ....
,, ,, मोरेश्वर नानाभाई कोठारे.
,, ,, नानाभाई काशिनाथ नाईक.
,, ,, विनायकराव माधवराव पितळे.
,, ,, श्रीधर अनंत मिराशी .....
,, ,, सिताराम नारायण........
,, ,, पुतोबा श्रीकृष्ण...........
,, ,, गणपतराव श्रीधर .......
,, ,, जगन्नाथ भास्कर ..........
,, ,, एसोबा दादाजी ...........
,, ,, मुतुस्वामी नायडू. ........
,, ,, शामराव गणपतराव तळपडे.
,, ,, भगवंतराव सखोबा. ....
,, ,, नारायण सदाशिवजी. ....
,, ,, वामन विनायक. .......
,, ,, विष्णु अमृत. ..........
,, ,, रघुनाथ रामचंद्र शिरगांवकर.
,, ,, सखाराम धोंडदेव गुप्ते.
,, ,, सखाराम विठ्ठल. .......
,, ,, वामन शिवराम. .......

मुंबई.

रा. रा. भाऊ हरिचंद. .......
,, ,, जनार्दन दामोदर कोल्हटकर.
,, ,, रामचंद्र विठ्ठल. .... ....
,, ,, रघुनाथ गणेश. .... ....
,, ,, नानाभाई H. ........ ....
,, ,, केरोबा दामोदर. .......
,, ,, विठ्ठल बाळकृष्ण कामत.
,, ,, मंगेश हरि निरुरकर. ....
,, ,, विनायक जगन्नाथजी. ....
,, ,, आनंदराव रावजी. .......
,, ,, दामोदर बजाबा. .......
,, ,, शिवराम रामचंद्र .........
,, ,, सिताराम बाबाजी गुरजर.
,, ,, राजाराम विठ्ठल ..........
,, ,, पांडोबा विठूजी माळी ....
,, ,, रामचंद्र आत्माराम .......
,, ,, माधवराव बाबाजी पाटील.
,, ,, शंकर नानाजी ..........
,, ,, कोंड्या लिंगू .............
,, ,, हरिचंद पुरुषोत्तम. ........
,, ,, नारायण काशिनाथ .......
,, ,, हरि रामचंद्र कुळकर्णी ....
,, ,, राजाराम बाळकृष्ण केळकर
,, ,, रामचंद्र गणपतजी .......
,, ,, रामचंद्र नारायण बहुतुले ...
,, ,, भास्कर गणेश आपटे ....
,, ,, वामन काशिनाथ. .......
,, ,, रामचंद्र केरोबा भेंडे .......

मुंबई.

रा. रा. नारायण केरोबा भेंडे .....
,, ,, गणपत गवरोबा .........
,, ,, भास्कर विठोबा ...........
,, ,, नारायण दादाजी .........
,, ,, गोविंद विष्णु भिडे .........
,, ,, वामन विठोबा ............
,, ,, दिनकर विष्णु ............
,, ,, लक्ष्मण बाळकृष्ण ........
,, ,, गणपत रामचंद्र............
,, ,, जयशंकर केरोबा .........
,, ,, धोंडो रामचंद्र ............
,, ,, द्वारकानाथ रामचंद्र .......
,, ,, येशवंतराव भास्करजी.....
,, ,, बाबुराव विठ्ठल नाबर. ....
,, ,, हरिश्चंद्र शामराव. ........
,, ,, चिंतोबा माणिकजी. ....
,, ,, व्यंकटेश आत्माराम. ....
,, ,, लक्ष्मण माणिकजी. ....
,, ,, गणपत A. पालेकर. ....
,, ,, शामराव नारायणजी धागे.
,, ,, नारायण हिराजी. ........
,, ,, आनंदराव विनायक. ....
,, ,, विनायक आनंदराव. ....
,, ,, नानू नारायण कोठारे. ...
,, ,, गोपाळ पाडुरंग भांडारी.
,, ,, मोरेश्वर R कामत. ....
,, ,, विष्णु जिवाजी पागनिस.
,, ,, बापुभाई भगवंतराव दळवी.
,, ,, मुकुंद रामचंद्र. ........
,, ,, जगन्नाथ पाडुरंग. ........

मुंबई.

रा. रा. जगन्नाथ भिकाजी डेघे.
,, ,, गोविंदराव दामोदरजी. ....
,, ,, विनायक धोंडजी. ........
,, ,, नारायण महादेव चिटणिस.
,, ,, नारायण बापूजी. ........
,, ,, आनंत V. खोत. ........
,, ,, K. रघुनाथ. ............
,, ,, G. B. गुंजिकर. ........
,, ,, R. K. वागाईतकर. ....
,, ,, कृष्णनाथ गोविंदनाथ. ....
,, ,, राजाराम खंडेराव. ........
,, ,, राघोबा जगन्नाथ. ........
,, ,, रामचंद्र जगन्नाथ. ........
,, ,, घनस्वामी पंडित. ........
,, ,, व्यंकटेश बाळाजी. ........
,, ,, विनायक नारायण.........
,, ,, महादेव श्रीकृष्ण कोल्हार.
,, ,, आत्माराम बाळकृष्ण. ....
,, ,, भाई रामचंद्र. ...........
,, ,, हरिचंद दशरथजी.........
,, ,, शंकर दामोदर. ........
,, ,, B. Ramchander. ..........
,, ,, N. S. Kale................
,, ,, नारायण रामचंद्र. ........
,, ,, दाजी गोपाळ............
,, ,, नारायण विश्राम. ........
,, ,, मधुसुदन मुकुंदजी.........
,, ,, दादाजी आत्माराम. ....
,, ,, गजानन कृष्णनाथ. ....
,, ,, बाळजी कृष्णनाथजी. ....

मुंबई.

रा. रा. केशव शिवराम. ........
,, ,, रामचंद्र हरजी. ........
,, ,, K. Harichandji. ... ...
,, ,, विनायक पिलाजी. ........
,, ,, बापूजी विठोबा. ..... ...
,, ,, रामचंद्र गोविंदजी. .......
,, " सुंदरराव रामचंद्रजी. ....
,, ,, विठ्ठल वामनराव. ........
,, ,, बाळकृष्ण विठ्ठल. ........
,, ,, सदाशिव विठ्ठल. ........
,, ,, रामचंद्र सदाशिव राजाध्यक्ष.
,, ,, पांडुरंग बाळकृष्ण चाचड.
,, ,, त्रिंबकराव बापूजी मायदेव ....... ........ ....
,, ,, महादेव रामचंद्र बापट ....
,, ,, गोपाळ गणेश गडबोले....
,, ,, गणेश केशव वैद्य ........
,, ,, दामोदर त्रिंबक नेने........
,, ,, गणपत पांडुरंग. ........
,, ,, जगन्नाथ गणेश. ........
,, ,, नारायण वासुदेव नवलकर.
,, ,, मोरोबा नारायण. ........
,, ,, कृष्णराव भाऊ...........
,, ,, पुरुषोत्तम सखाराम ........
,, ,, नानुजी बापूजी ...........
,, ,, मुकुंदराव भास्करजी........
,, ,, गणपतराव बाळाजी.... ...
,, ,, मोटाभाई आनंदराव........
,, ,, कृष्णराव शिवशंकर.... ...
,, ,, जगन्नाथ कृष्णराव ........

मुंबई.

रा. रा. G. B. तळपडे ...........
,, ,, जनार्दन जगन्नाथ प्रधान...
,, ,, गोविंदराव केशवजी........
,, ,, भाउ कृष्ण....... ........
,, ,, गंगाधर देवजी ...........
,, ,, आनंदराव दामोदर ........
,, ,, शंकर रामचंद्रजी ........
,, ,, सखाराम दाजी रेगे ....
,, ,, गणपतराव पांडुरंगजी नाईक
,, ,, भाऊ मोरोबा देसाई........
,, ,, मदन बापू ..............
,, ,, जनार्दन आत्माराम ........
,, ,, रावजी गोविंद ...........
,, ,, गणेश महादेव ...........
,, ,, दिनकर भिकाजी .... ....
,, ,, D. मोरोबा...............
,, ,, S. M. Chandroba..........
,, ,, परजाराम जयशंकर........
,, ,, शिवराम मोरेश्वर ..........
,, ,, रामचंद्र गोविंद राजाध्यक्ष.
,, ,, शांताराम पांडुरंग ........
,, ,, काशिनाथ पांडुरंग सोमणे.
,, ,, शामराम हरिश्चंद्र डेगे .....
,, ,, B. M. Rungit, ........
,, ,, विश्वनाथ बाळकृष्ण........
,, ,, दामोदर मधुसूदन मंत्री ...
,, ,, रघुनाथ सखाराम ........
,, ,, विनायक सखाराम . .......
,, ,, कृष्णराव रघुनाथ . . ...
,, ,, दिनानाथ बाबाजी ........
,, ,,

मुंबई.

रा. रा. त्रिंबक रघुनाथ .... ....
रा. ब. दाजी गंगाजीराव राणे .....
रा. रा. दिनानाथ सुंदरजी ........
,, ,, काशिनाथ मेघशाम........
,, ,, आत्माराम पांडुरंग ........
,, ,, रावजी जिवनजी ........
,, ,, जनार्दन कृष्णाजी ........
,, ,, नरसू नरसाप्पा ............
,, ,, माधवराव रंगराव ..........
,, ,, नाना बाळाजी .... ........
,, ,, पुरुषोत्तम बापूजी ..........
,, ,, मोरोबा भास्करजी .........
,, ,, गणपतराव नाना .........
,, ,, विनायक रामचंद्र .........
,, ,, विनायकराव मोरोबा.........
,, ,, गणपत बापूजी............
,, ,, जबलपूर आणि कंपनी ....

पेण.

,, ,, सखाराम भगवंत देशपांडे.
,, ,, आत्माराम देवाजी देशपांडे
,, ,, विनायक गोविंद आघरकर
,, ,, गणेश व्यंकाजी ताह्मणे.
,, ,, नारायण गणेश मंडलिक.
,, ,, महादेव काशिनाथ आपटे.
,, ,, भास्कर विश्वनाथ करमरकर

द्वारका.

,, ,, गोपाळ वल्लाळ खरे. ...

शेवगांव

रा. रा. बाबाजी महादेव देशपांडे.
,, ,, बळवंत वामन वैद्य. ....

भुसावळ.

,, ,, वासुदेव रामचंद्र जोग. ....

पुणे.

,, ,, विष्णु चिंतामण भोपटकर.

सोलापूर.

,, ,, हरि अनंत परांजपे. ....
,, ,, गोविंद व्यंकाजी सांगोलेकर.

बडोदें.

रा. रा माधवराव सदाशिव, कार्यें-वाड दिवाण
,, ,, जनार्दन सखाराम गाडगीळ.

रत्नागिरी.

रा० सा० रंगराव भिमाजी- हु. डे. कलेक्टर.

बांदे संस्थान सावंतवाडी.

रा. रा. महादेव गणेश सरवटे .....

माणिकवाडा.

रा. रा. लक्ष्मणराव आणा ........

महाड.

श्री. रा. रा. अप्पा साहेब भोसले, राजे, सावंतवाडीकर........

गजेंद्रगड.

श्री. रा. रा. भुजंगराव घोरपडे हिंदुराव, संस्थान गजेंद्रगड.